अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com | बुधवार, दि. ७ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २४८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# शिक्षण क्षेत्रात लाचखोरीचा ‘कळस’ लुटलेल्यांच्या भोवती आवळला ‘फास’


## ३६ अधिकाऱ्यांच्या चौकशीचे एसीबीला पत्र, खुद्द शिक्षण आयुक्तांनीच घेतला ‘ध्यास’

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या शिक्षण विभागातून एक धक्कादायक माहिती उजेडात आली आहे. शिक्षण विभागात मोठा भ्रष्टाचार सुरू असून लाचखोरी आणि टक्केवारीतून शिक्षण क्षेत्र नासवलेल्या राज्यभरातील ३६ शिक्षण अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणी खुद्द शिक्षण आयुक्त सुरज मांढरे केली आहे.विशेष म्हणजे या मागणीचे पत्र त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंधक समिती अर्थात एसीबीला शिक्षण क्षेत्रात खळबळ माजली आहे तर पैसा व दागिन्यांनी घर भरून घेतलेल्या अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. शिक्षण कशासाठी? शिक्षणातून माणूस घडतो.शिक्षणातूनच देशाचा भावी आदर्श नागरिक बनू शकतो,असे विचारवंत नेहमीच सांगत असतात पण आजचे शिक्षण क्षेत्र भ्रष्टाचाराची गंगोत्री झाली. शिक्षण खात्यात लाचेची आणि टक्केवारीची गंगा वाहते आहे.सरकार कुठल्याही राजकीय पक्षांचे असो. अशा लाचखोरांच्या केसाला धक्का लावू शकत नाही, हीच आपल्या राज्याची मोठी शोकांतिका आहे.**

आयुक्तांच्या पत्रानुसार पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर यासारख्या जिल्ह्यातील लाचखोर शिक्षक, शिक्षण अधिकाऱ्यांची चौकशी होण्याची शक्यता होण्याचे संकेत आहेत.

गेल्या काही महिन्यात शिक्षण विभागात गैरव्यवहार सुरू असल्याच्या घटनाही समोर आल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी नाशिकमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नाशिक महापालिका शिक्षण अधिकारी सुनिता धनगर यांना ५० हजाराची लाच घेताना अटक करण्यात आली. त्यांच्याकडे इतके घबाड सापडले की,त्याची मोजदार होऊच शकत नाही. काही महिन्यांपूर्वी सोलापूरचे शिक्षण अधिकारी किरण लोहार यांचेही गैरव्यवहार समोर आले. दोन वर्षांपूर्वी नाशिकमध्येच एक महिला शिक्षणाधिकारी आठ लाखांची लाच घेताना सापडल्या. धनगर आणि लोहार सारखे हजारो अधिकाऱ्यांनी शिक्षण खात्याचा धंदा चालवला आहे. कुठले सरकार आणलात.या मंत्र्या-संत्र्यांची सत्ता चार दिवसाची असते.खरी सत्ता आमच्या हातात आहे.तेव्हा आमच्या खुर्चीला कुणीच धक्का लावू शकत नाही, अशी मुजोरीची भाषा सरकारी आणि निम सरकारी अधिकाऱ्यांमध्ये अत्यंत धाडसाने बोलली जाते.




या घटनांच्या पार्श्वभूमीवर मांढरे यांनी थेट लाचलुचपत विभागालाच पत्र लिहून शिक्षण विभागातील ३६ ते ४० अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी केली आहे. जानेवारी २०२३ मध्येच त्यांनी लाचलुचपत विभागाला हे पत्र लिहिले होते. शिक्षण अधिकारी, उपसंचालक लाखो रुपयांची लाच घेतात. पकडलेही जातात, पण पुढे काय होते. अशा अधिकाऱ्यांची खुली चौकशी व्हावी, यासाठी जनतेनेच पुढे येऊन हे सांगायला हवे. या लोकांनी कशी लाच घेतली आणि कुठे कुठे संपत्ती जमा केली आहे, असे मांढरे यांनी म्हटले आहे.

अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची खुली चौकशी झाली तर ते जनतेच्या समोर येतील. शिक्षकांच्या रजा, वैद्यकीय रजा, मंजूर करणे, बिले घेणे, संच मान्यता, इथपासून ते बदलीपर्यंत सर्व ठिकाणी शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे, या सर्व गोष्टी स्वत: शिक्षण आयुक्तांच्याच लक्षात आल्यामुळे त्यांनी या अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी करण्यास पुढे आल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, ज्या अधिकाऱ्यांची आम्हाला माहिती मिळाली आहे, त्या सर्व अधिकाऱ्यांची चौकशी सुरू असल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षकांनी दिली.

**एसीबी काय करते? :** भ्रष्टाचार रोखण्यासाठी शासनाने भ्रष्टाचार प्रतिबंधक समिती अर्थात एसीबी स्थापन करण्यात आली आहे. लाचखोरांचा बंदोबस्त करण्याची या समितीची मोठी जबाबदारी असते. किती लाचखोरांनी निपक्षपणे चौकशी झाली.त्यातील किती लोकांना शिक्षा झाली याची माहिती लोकांना का मिळू शकत नाही.केवळ पुराव्याची कारणे समोर करून एसीबी हात झटकत राहाणार आहे काय? असा जनतेचा सवाल आहे. लाच घेतल्याचे ॲन्टी करप्शनच्या समोरच घडलेले असते.याशिवाय दुसरा मोठा पुरावा कुठला असू शकतो.लाच घेतल्यानंतर फार फार काय होणार आहे? सस्पेंड होवून सहा महिन्यांचा निम्मा पगार तरी मिळतो ना? अशी उर्मट-उद्धटाची भाषा लाचखोर अधिकारी-कर्मचारी बेधडकपणे वापरत असतात.म्हणजे गुन्हेगारांप्रमाणे ह्यांनाही कायद्याचा धाक राहिलेला नाही, अशी लोकांची खंत आहे.

**डोळे गरगरतील... :** मांडरे यांनी आपल्या पत्रात ज्या ४०अधिकाऱ्यांच्या संपत्तीची माहिती दिली आहे,त्यातील आकडे धक्कादायक आहे.त्याची मोजदार करताच येणार नाही.गलेलठ्ठ पगारासह घरातील लोकांची आणि त्यांच्या सग्यासोयऱ्यांची संपत्ती उघड झाली तर सामान्य जनांचे डोळे गरगरायला लागतील. पोलीस दल, सरकारी आणि निम सरकारी क्षेत्रातील लाचखोरीबद्दल जनतेत प्रचंड संताप आहे. निदान जनतेच्या मनाची लाच राखून तरी एसीबीने मांढरे यांच्या पत्राची दखल घेत लाचखोर अधिकाऱ्यांच्या मुसक्या आवळाव्यात,अशी कॉमन पिपलची अपेक्षा आहे.



# धरसोडीचा फटका...

जागतिक पर्यावरण दिन नुकताच साजरा झाला. वसुंधरेची आळवणी या दिवशी झाली. विचारवंतांची व्याख्याने देखील झाली. 'नेमेचि येतो पावसाळा', असे म्हणतात, त्याप्रमाणे दरवर्षी प्रसार माध्यमे आवर्जून पर्यावरणाचे महत्त्व, त्याचे संवर्धन कसे करावे यावर अनेक गोष्टी प्रसिद्ध करत असतात. इतकेच नव्हे तर, सामाजिक पातळीवर वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून पर्यावरणाच्या संवर्धनाविषयी जनजागृती करण्यात येते. केंद्र व राज्य सरकार पर्यावरणाशी संबंधित कायदे पारित करत असते. इतक्या मोठ्या प्रमाणात संवर्धनाची मोहीम होत असतानाही वर्षागणिक पर्यावरणाच्या संबंधित तक्रारींत वाढच होत असल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'प्लास्टिक'. प्लास्टिक घातक आहे, त्याचे विघटन होत नाही; त्याच्या वापरावर बंदी येणे गरजेचे आहे, असे दरवर्षी आपण ऐकतो. परंतु गेल्या वर्षापेक्षा नव्या वर्षात प्लास्टिकच्या कचऱ्यात अधिकच भर पडल्याचे चित्र उभे राहते. याच पार्श्वभूमीवर सरकारकडून नवे कायदे केले जातात, काही दिवस त्याची अंमलबजावणी करण्यात येते. त्यानंतर 'जैसे तीच' परिस्थिती असते. त्यामुळे हे कायदे किती उपयुक्त ठरतात हा वादाचाच मुद्दा ठरतो. चार वर्षांपूर्वी म्हणजेच २०१८ साली करण्यात आलेल्या प्लास्टिक बंदीच्या कायद्यात गेल्याच वर्षी महाराष्ट्र सरकारतर्फे सुधारणा करण्यात आली. हा भारतीय प्लास्टिक कायद्यांच्या मालिकेतील पाचव्या क्रमांकाचा कायदा होता. या कायद्यात २०२२ साली झालेल्या सुधारणेनुसार कंपोस्टेबल मटेरियल तसेच ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या प्लास्टिक पॅकेजिंग मटेरियलपासून तयार केलेल्या उत्पादनांना उत्पादनासाठी व वापरासाठी सशर्त परवानगी देण्यात आली. या निर्णयामुळे या प्लास्टिकच्या वस्तूंचे उत्पादक आणि व्यापारी यांना आर्थिक दिलासा मिळाला पण प्लास्टिकचा प्रश्न मात्र तसाच कायम राहिला. गेल्याच वर्षी म्हणजे २०२२ मध्ये प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या एका अधिकारप्राप्त




समितीने ७ जुलै २०२२ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादने (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवण) अधिसूचना यामध्ये सुधारणा करण्याचा ठराव केला. या बैठकीत करण्यात आलेल्या शिफारशींच्या आधारे १५ जुलै २०२२ रोजी एक अधिसूचना जारी करण्यात आली. ज्यामध्ये प्लास्टिक-लेपित आणि लॅमिनेटेड डिस्पोजेबल डिश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाटी आणि कंटेनर (एकल-वापर उत्पादने) कागद किंवा ॲल्युमिनियमपासून तयार करण्यावर बंदी घालण्यात आली. परंतु त्याच बरोबरीने काही प्लास्टिक उत्पादनावर व वापरावर सवलतीही देण्यात आल्या. त्यामुळेच पर्यावरणप्रेमींकडून या सवलतींवर टीका करण्यात आली. राज्यातील कायद्यानुसार ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असणाऱ्या प्लास्टिक उत्पादनांच्या वापरावर बंदी होती. आता नव्या सुधारणेनुसार ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या प्लास्टिक पॅकेजिंग मटेरियलपासून तयार केलेल्या उत्पादनांना उत्पादनासाठी व वापरासाठी काही अटींसह (सशर्त) परवानगी देण्यात आली आहे. सरकारच्या या धरसोड वृत्तीचा फटकाही प्लास्टिक बंदीला बसला आहे. त्यामुळे या राज्यात खरोखर प्लास्टिकबंदी कधी काळी अस्तित्वात येणार का, हा प्रश्नच आहे. २०१६ साली मोदी सरकारने नियम आणखी कडक केले. प्लास्टिकच्या पिशवीच्या जाडीची मर्यादा ५० मायक्रॉनपेक्षा अधिक असणं बंधनकारक करण्यात आले. दरखेपेस कायदे कडक असल्याची हमी देण्यात येते. परंतु प्रत्यक्षात या कायद्यांची किती अंमलबजावणी होते, हा संशोधनाचाच विषय आहे. केवळ प्लास्टिकच्या पिशव्या असा ओघवता उल्लेख करण्यात आला तरी प्लास्टिकचा वापर त्या पिशव्यांपुरता मर्यादित नसतो. या प्लास्टिकच्या वापरात अनेक पैलू समाविष्ट असतात, हे येथे विसरून चालणार नाही. कायद्याने बंदी असली तरी बेकायदेशीर पद्धतीने सर्रास ५० मायक्रॉनपेक्षा कमी असलेल्या पिशव्याच बाजारात सर्वत्र पाहायला मिळतात. प्लास्टिकचा सर्वाधिक वापर करणारा समाजदेखील सरकारइतकाच जबाबदार आहे.

## सामाजिक

▶ प्लास्टिक प्रदूषण

# पर्यावरणाचा गळा घोटणारे

पर्यावरण हा पृथ्वीवरील जीवनाचा आधार आहे. पर्यावरण हे सर्व सजीव आणि निर्जीव घटकांपासून बनलेले आहे. प्राणी, पक्षी, झाडे, जंगले, समुद्र, पर्वत, हवा, खनिजे इत्यादी सर्व पर्यावरणाचा भाग आहेत. जीवसृष्टीसाठी पर्यावरण अनुकूल ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, परंतु पर्यावरणाचे सर्वाधिक नुकसान मानवच करतात. पर्यावरण संबंधी जागृतीसाठी दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन नवीन थीमसह जगभरात साजरा केला गेला. यावर्षी २०२३ ची थीम प्लास्टिक प्रदूषणावरील उपायांवर केंद्रित होती. जगभरात प्लास्टिक प्रदूषण ही एक मोठी समस्या बनली आहे. दरवर्षी ४० कोटी टनांहून अधिक प्लास्टिक तयार होते, त्यापैकी निम्मे फक्त एकदाच वापरले जाते. आज आपण मायक्रोप्लास्टिक्स खातो-पितो आणि प्राणवायू स्वरूपात प्लास्टिक मिसळलेल्या प्रदूषित हवेत श्वास घेतो, त्यामुळे दर ३० सेकंदाला एक मृत्यू होत आहे. वातावरणातील बदलांमध्ये प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा वाटा आहे.

प्रदूषणामुळे पर्यावरणाचा समतोल सातत्याने बिघडत असून, त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग, नैसर्गिक आपत्ती, रोगराई यांसारख्या समस्या वाढल्या आहेत. त्यामुळे मानवी जीवनाला धोका निर्माण झाला आहे. प्लॅस्टिकमुळे जनावरे मारली जातात, माती प्रदूषित होते, प्लास्टिक पिशव्या नाल्यात अडकतात. प्लास्टिक प्रदूषणामुळे वंध्यत्व, लठ्ठपणा, मधुमेह, प्रोस्टेट किंवा स्तनाचा कर्करोग, थायरॉईड समस्या, हृदयविकार आणि पक्षाघाताचा धोका वाढतो. टीअरफंडच्या नवीन संशोधनानुसार, जगभरातील विकसनशील देशांमध्ये प्लास्टिकच्या समस्येमुळे दरवर्षी ४ ते १० लाख लोकांचा मृत्यू होत आहे.

पृथ्वीचा ७१% भाग पाण्याने व्यापलेला आहे आणि एकूण पाण्यापैकी ९७% समुद्रात आहे. मानवी क्रियाकलापांमुळे सागरी प्रदूषण पर्यावरणासाठी घातक ठरला आहे. दर मिनिटाला दोन मोठे ट्रक एवढा प्लास्टिकचा कचरा समुद्रात टाकला जातो. युनोमिया २०१६ नुसार, दरवर्षी १.२ कोटी टन प्लास्टिक समुद्रात टाकले जाते आणि २०४० पर्यंत दरवर्षी २.९ कोटी मेट्रिक टन प्लास्टिक कचरा महासागरात जाण्याची शक्यता आहे. जगातील जवळजवळ सर्व जलप्रणालींमध्ये विविध स्वरूपात मायक्रोप्लास्टिक्स आहेत. मारियाना ट्रेंचच्या ठिकाणी ३६००० फूट खोलवर सुद्धा प्लास्टिक सापडले आहे. आईयूसीएन २०20 नुसार, ८०% सागरी मलबा फक्त प्लास्टिकचा कचरा आहे. २०२५ पर्यंत, महासागरांमध्ये माशांपेक्षा एक तृतीयांश अधिक प्लास्टिक असेल आणि २०५० पर्यंत महासागरांमध्ये माशांपेक्षा प्लास्टिक जास्त असेल. संयुक्त राष्ट्राच्या म्हणण्यानुसार, प्लास्टिकमुळे दरवर्षी अंदाजे १ दशलक्ष समुद्री पक्षी आणि १ लक्ष सागरी प्राणी मारले जातात आणि शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की जर हा दर असाच चालू राहिला तर २०५० पर्यंत जगातील ९९% समुद्री पक्ष्यांच्या प्रजाती प्लास्टिक खात असतील. प्लॅस्टिकमुळे कोरल रीफवर रोग होण्याची शक्यता २२ पटीने वाढते. सागरी जीवांमध्ये प्लॅस्टिक विषबाधा अन्नसाखळी संपवायला गती देत आहे, ज्यामुळे आरोग्यावर घातक परिणाम होण्याची शक्यता आहे.

आता पकडलेल्या तीनपैकी एका माशामध्ये प्लास्टिक असते. अन्नसाखळीच्या पायथ्याशी असलेले अनेक प्राणी मायक्रोप्लास्टिक खातात, मग इतर जीव त्यांना खातात, मानवही त्या जीवांना खातात. शास्त्रज्ञांना ११४ समुद्री प्रजातींमध्ये मायक्रोप्लास्टिक सापडले आहे आणि यापैकी सुमारे एक तृतीयांश प्रजाती मानवांच्या खाण्यातील आहेत. प्लास्टिक तुटून शेत जमिनीत मायक्रोप्लास्टिक्स म्हणून दबून असते. लँडफिलमध्ये खोलवर गाडलेल्या प्लास्टिकच्या कचऱ्यातून हानिकारक रसायने बाहेर पडू शकतात जे जमिनीच्या पाण्यात पसरू शकते. लँडफिल्समध्ये २ दशलक्ष टनांहून अधिक पाण्याच्या बाटल्यांचा ढीग आहे. प्लास्टिक नकळत आपल्या प्लेटमध्ये येतात, निष्कर्ष असे सूचित करतात की आपण दरवर्षी हजारो प्लास्टिकचे कण गिळतो. प्लास्टिकमध्ये असणारे अन्नपदार्थ, कॅन केलेला खाद्यपदार्थ यातूनही प्लास्टिक आपल्या शरीरात प्रवेश करू शकते. आपण बाटलीबंद पाण्यातून मायक्रोप्लास्टिक पितो, जागतिक आरोग्य संघटनेने २०१८ मध्ये धक्कादायक संशोधन प्रकाशित केले, ज्यात ९०% बाटलीबंद पाण्यात मायक्रोप्लास्टिक उपस्थिती उघड केली, चाचणी केलेल्या २५९ बाटलीबंद पाण्यापैकी फक्त १७ बाटलीबंद पाणी प्लास्टिकमुक्त होते. निकृष्ट कचरा व्यवस्थापनामुळे मोकळ्या हवेत कचरा जाळल्याने लोक प्रदूषित हवेत श्वास घेतात. मार्च २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालात असे दिसून आले आहे की, जागतिक स्तरावर ५ अब्ज लोक



कचरा संकलन किंवा कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता जगतात. परिणामी दरवर्षी सुमारे ९ दशलक्ष लोक मरतात. १ टन प्लास्टिकच्या उत्पादनातून २.५ टन कार्बनडायऑक्साइड तयार होतो. आपण कपड्यांमधून देखील प्लास्टिक शोषतो, ग्लोबल अपेरल फायबर कंझम्पशनच्या संशोधनानुसार, एका वर्षात जगभरात वापरल्या जाणाऱ्या १,००,००० किलो फायबरपैकी ७०% सिंथेटिक असतात.

आजवर तयार झालेला प्रत्येक प्लास्टिकचा तुकडा आताही वातावरणात आहे. डब्ल्यूडब्ल्यूएफ ऑस्ट्रेलिया (वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड) नुसार, प्लास्टिक उत्पादने पूर्णपणे नष्ट होण्यास बराच काळ लागतो, हे त्यांच्या बनावट आणि गुणवत्तेवर अवलंबून असते जसे-प्लास्टिक पिशवी नष्ट होण्यासाठी किमान २० वर्षे, कॉफी कप ३० वर्षे, प्लॅस्टिक स्ट्रॉ २०० वर्षे, प्लास्टिकच्या बाटल्या ४५० वर्षे, प्लास्टिक कप ४५० वर्षे, डिस्पोजेबल डायपर ५०० वर्षे आणि प्लास्टिकचे टूथब्रश सामान्यतः ५०० वर्षे खंडित होण्यास लागतात. अमेरिकन दररोज ५०० दशलक्ष प्लास्टिक स्ट्रॉ वापरतात. संयुक्त राष्ट्राच्या म्हणण्यानुसार १९५० पासून ८.३ अब्ज टन प्लास्टिक तयार केले गेले आहे. जगभरात दर मिनिटाला १ दशलक्ष एकल-वापराच्या प्लास्टिकच्या बाटल्या विकत घेतल्या जातात आणि दरवर्षी १२०० अब्जपेक्षा जास्त प्लास्टिकच्या बाटल्या विकल्या जातात. पॉलीस्टीरिन वातावरणात दहा लाख वर्षांहून अधिक काळ टिकून राहू शकते.

द एनर्जी अँड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट २०१८ नुसार, देशात एकूण प्लास्टिक कचऱ्यापैकी केवळ ६०% पुनर्वापर होत आहे. भारतात उत्पादित प्लास्टिकपैकी ४३% उत्पादन पॅकेजिंगसाठी वापरले जाते आणि प्लास्टिकचा सरासरी दरडोई वापर सुमारे ११ किलो आहे. सीपीसीबीच्या अहवालानुसार, एकूण घनकचऱ्यामध्ये प्लास्टिकचा वाटा ८% आहे. प्लास्टिकचे सर्वाधिक उत्पादन दिल्लीत होते, त्यानंतर कोलकाता आणि अहमदाबादचा क्रमांक लागतो. समुद्रकिनाऱ्यांवरील प्लास्टिक कचऱ्यातून तांबे, जस्त, शिसे आणि कॅडमियम यासारख्या विषारी जड धातूंच्या मोठ्या प्रमाणामुळे किनारपट्टीवरील परिसंस्थांवर विपरीत परिणाम होतो.

प्रत्येक टन प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर केल्याने अंदाजे ३.८ बॅरल पेट्रोलियमची बचत होते. देशातील चेन्नईमधील जांबुलिंगम स्ट्रीट २००२ मध्ये बांधण्यात आलेल्या भारतातील पहिल्या प्लास्टिकच्या रस्त्यांपैकी एक होता. २०१५-१६ मध्ये, राष्ट्रीय ग्रामीण रस्ते विकास संस्थेने प्लास्टिक कचऱ्याचा वापर करून सुमारे ७५०० किमींचे रस्ते बांधले. प्रत्येक व्यक्तीने आपापल्या स्तरावर प्लास्टिकचा वापर कमी करून त्याचे उच्चाटन केले पाहिजे. पर्यावरण वाचवायचे असेल तर प्लास्टिक उत्पादनांवरचे अवलंबित्व कमी करावे लागेल. पर्यावरणाचे रक्षण हे आपल्या जीवनाचे रक्षण आहे.

**- डॉ. प्रितम गेडाम, नागपूर.**

## टुडेज् ब्लॉग

# कोकणात 'वंदे भारत'

भारतीय रेल्वेने सुरू केलेली 'वंदे भारत' एक्स्प्रेस देशाच्या अनेक राज्यात सुरू करण्यात आली आहे. या गाडीचा कोकणी माणसाला नक्कीच आनंद झाला असेल, यात शंका नाही. मात्र, सर्वप्रथम प्रश्न असा उभा राहतो तो असा की, खरंच कोकण रेल्वे ही कोकणवासीयांसाठी आहे का? कोकण रेल्वेची स्थापना झाल्यापासून कोकण रेल्वे मार्ग हा कोकणासाठी कमी आणि दक्षिण भारत व कर्नाटक गोव्यासाठी जाणाऱ्या गाड्यांसाठी जास्त उपयोगात आणला गेला. कर्नाटक, गोवा, केरळ येथे जाण्यासाठी हा मार्ग शॉर्टकट ठरला आणि दिवसरात्र या मार्गावर लांब पल्ल्याच्या गाड्या धावू लागल्या. यात कोकणी प्रवाशांची फार मोठी कुचंबणा होऊ लागली. ज्या कोकणी माणसासाठी ही रेल्वे बांधण्याचा घाट घातला गेला, ज्या कोकणी माणसांनी आपल्या जमिनी या प्रकल्पासाठी देऊ केल्या, त्या कोकणी माणसावरच रेल्वे गाडीत उभ्याने व लटकून प्रवास करण्याची वेळ आली.

कोकणवासीयांचा विचार करता आज फारच कमी गाड्या त्यांच्यासाठी उपलब्ध आहेत. बाकी सर्व गाड्या गोव्यात मडगाव अथवा पुढे कर्नाटक व केरळपर्यंत जातात. त्यामुळे कोकणातील प्रवाशांसाठी एकही गाडी नाही, कोकणात रेल्वेसाठी एकही मोठे टर्मिनस नाही, गाड्यांच्या देखभालीसाठी कोकणात मोठे स्थानक नाही, परिणामी एकही गाडी कोकणातील सुटत नाही. ज्या गाड्या आहेत, त्या कोकणात आल्या की लगेचच परतीच्या प्रवासाला लागतात.

आजही कोकण रेल्वे एकाच मार्गावर चालते. त्यात पनवेल ते रोहा नुकतेच दुहेरीकरण पूर्ण झाले. त्यामुळे या मार्गावर वाहतूक सुरळीतपणे सुरू असते. मात्र, पुढे गोव्यापर्यंत एकेरी मार्ग असल्याने प्रत्येक छोट्या-मोठ्या स्थानकांवर रेल्वे गाडी साईडिंगला घ्यावी लागते व दुसऱ्या समोरील गाडीला अथवा मागच्या जलद गाडीला मार्ग द्यावा लागतो. त्यामुळे प्रवासाचा अवधी वाढतो व ताटकळत प्रवास करावा लागतो. त्यातच आता परराज्यातील गाड्यांची या मार्गावर इतकी संख्या वाढवण्यात आली आहे व काही जुन्या गाड्या कोकण मार्गावर वळवण्यात आल्यामुळे गाड्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. मात्र, एकेरी मार्गावर गाड्या चालवणे कोकण रेल्वेला दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. त्यातच लगोलग दुहेरीकरण करणे म्हणजे इतके सोपे नाही. कारण कोकण रेल्वे दऱ्याखोऱ्यांतून उंच डोंगरावरून गेल्याने मोठ-मोठे लांबीचे बोगदे व उंच उंच पुलांवर कोकण रेल्वे बांधली गेली आहे. त्यामुळे दुहेरीकरण करणे रेल्वेसाठी मोठे आव्हान आहे. तसे करावयाचे झाल्यास मोठा कालावधी लागणार आहे. त्यातच आता या मार्गावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कृपेने देशातील सर्वात आधुनिक व वेगवान अशी वंदे भारत रेल्वे सुरू झाली आहे. कोकणातील दऱ्या-खोऱ्यांतून ही प्रगत रेल्वे 'वंदे भारत' धावणार आहे.



कोकणासाठी ही नक्कीच अभिमानाची गोष्ट आहे, यात शंकाच नाही. मात्र खरंच याचा फायदा कोकणी माणसाला होईल का? या गाडीचा वेग प्रचंड आहे, मात्र मुळात एकेरी मार्गावर धावणारी कोकण रेल्वे या गाडीला अपेक्षित वेग मिळण्यासाठी रिकामा मार्ग मिळू शकणार आहे का? कोकणवासीयांच्या गणपती, होळी या सणात कोकण रेल्वेवर प्रचंड ताण असतो. मोठ्या प्रमाणावर गाड्या या मार्गावर सोडल्या जातात, तेव्हा या वंदे भरत रेल्वेसाठी इतर गाड्यांचा खोळंबा जागोजागी करून ठेवावा लागणार आहे.

**- अल्पेश म्हात्रे.**

## जन्म हा अखेरचा

# प्राणानुग्रहस्थल - १



**शिवस्य परकायस्य यत्**
**तात्पर्यावलोकनम् । तत्प्राणानुग्रह:**
**प्रोक्त: सर्वेषां तत्त्वदर्शिभि :।। (श्री**
**सिद्धांतशिखामणी, १७.२४)**

ज्याला परिस्थिती प्राप्त झालेली असते अशा शिवयोग्याला परशिवयोगी म्हणतात. परशिवयोगी आपल्या प्राणाला भगवद्रूपात विलीन करतो. हाच त्याने केलेला कुंभक होय. तो दृश्यमान विश्वाकडे हे शिवमय आहे, अशा तात्पर्यदृष्टीने पाहतो. तात्पर्य फार छोटे असते. एक तास प्रवचन ऐकून त्याचे तात्पर्य म्हणजे सारांश दोन वाक्यात सांगता आले पाहिजे. मनुष्याने तात्पर्य काय आहे, सार काय आहे, याचा विचार केला पाहिजे. योगाचे तात्पर्य काय? सर्व प्रपंचाला शिवरुपात पाहणे हे योगाचे तात्पर्य आहे. कुणाविषयी अनुराग बाळगणे तर कुणाचा द्वेष करणे हा जीवाचा स्वभाव. तो कुणाचा आदर करतो तर कुणाचा अवमान. परंतु शिव मात्र कुणाचा अनादर करत नाहीत. तो सर्वांचा परमादर करतो. सर्वांकडे समान दृष्टीने पाहतो. म्हणून त्याचे नाव 'शिव' आहे. जीवाचा शिव होतो तेव्हा तो सर्व प्रपंच परब्रह्मस्वरुपात पाहतो. जेव्हा प्रत्येक जीवाच्या ठिकाणी योगी आत्मरुप पाहतो तेव्हा त्याला कोणाबद्दल राग नसतो, द्वेष नसतो. राग-द्वेषासाठी द्वैताची गरज असते. परंतु इथे अद्वैत संचलेले असते. तुमचे स्वत:वर जेवढे प्रेम असते तेवढे विश्वावर आणि प्राणिमात्रावर करु लागाल तर तुम्हीही योगी व्हाल. यासाठीच हृदयस्थ शिवतत्त्वाचे दर्शन घ्यावे लागते. डोळे बंद करुन त्या आत्मारामाला न्याहाळावे लागते. आत काय नाही? आत तर सारेच भरलेले आहे. ब्रह्मांडात जे आहे ते सारे या पिंडात सामावलेले आहे. तुम्ही तीर्थयात्रेला जाता, यात्रेला अवश्य गेले पाहिजे. त्यामुळे भोगभूमी सोडण्याची थोडी सवय आपल्याला होते. घर सोडायचा हा अभ्यास प्रत्येकाने करायला हवा म्हणजे मग शेवटी जेव्हा कायम घर सोडायचा प्रसंग येतो तेव्हा फार दु:ख होत नाही.

आपले घर भोगभूमी असते तर तीर्थक्षेत्र योगभूमी असते. तेथे गेलेच पाहिजे. परंतु जशी बाह्य यात्रा आपण करतो तशीच अंतर्यात्रा देखील केली पाहिजे. बाह्ययात्रेत कष्ट अधिक आणि आनंद कमी असतो. महाशिवरात्रीच्या काशीविश्वेश्वराचे दर्शन घ्यायला तुम्ही येता. कारण तो भगवान शंकराचा अवतारदिन असतो. त्या दिवशी भगवान अधिक प्रसन्न असतात. जसे तुम्ही तुमच्या जन्मदिवशी अधिक प्रसन्न असता त्यासारखे. रामनवमीच्या दिवशी जशी रामाची पूजा बांधली जाते तेवढी इतर दिवशी बांधली जात नाही. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# निकालाची वाढती टक्केवारी; संख्यात्मक की गुणात्मक?

दहावीचा निकाल नुकताच लागला. अपेक्षेप्रमाणे यावर्षीही दहावीचा निकाल चांगला लागला. यावर्षी दहावीचा निकाल ९३ टक्के लागला.

विशेष म्हणजे यात शेकडो विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले. या निकालाचे स्वागत करतानाच ही टक्केवारी म्हणजे गुणवत्ता आहे का? असा प्रश्न पडतो. निकालाचे फुगलेले आकडे पाहिले की, राज्यात गुणवत्तेचा महापूर आला आहे का असे वाटते. पण ही गुणवता गुणात्मक आहे की संख्यात्मक याचाही शोध घ्यावा लागेल. कारण टक्केवारी वाढली म्हणजे गुणवत्ता वाढली असे होत नाही. उलट यामुळे परीक्षांचे महत्व कमी होत आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उत्तीर्ण होत असल्याने शिक्षणाच्या दर्जावर देखील प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. दोन दशकांपूर्वी दहावी बारावीच्या परीक्षेची विद्यार्थ्यांना भीती वाटत असे आता मात्र, विद्यार्थी आणि पालकांना परीक्षेत भरघोस गुण कसे मिळवायचे, हे माहीत झाले आहे. या भरघोस गुणांमुळे आणि कौतुकामुळे विद्यार्थी फाजील आत्मविश्वासाला बळी पडण्याची शक्यता आहे.



ज्या विद्यार्थ्याला दहावीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळतात ते विद्यार्थी बारावीनंतर काय करतात? हा संशोधनाचा विषय आहे. कारण बारावीनंतर उच्च शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट, जेईईसारख्या परिक्षेत महाराष्ट्र खूपच मागे आहे. दहावीच्या परीक्षेत दिसणारा निकालाचा फुगवटा तिथे मात्र दिसत नाही असे का? याचाही विचार करण्याची वेळ आली आहे. जीवनात ज्ञानाला सर्वाधिक महत्व आहे. आपली शिक्षण पद्धती ज्ञान केंद्रित नसून परीक्षा केंद्रित आहे. त्यामुळेच विद्यार्थी गुणवान होण्याऐवजी गुणवादी होत आहेत. आज देशाला मार्क्सवादी (गुणवादी) विद्यार्थी नकोत तर गुणवान विद्यार्थी हवेत. कारण संख्यात्मक निकाल हा उच्चशिक्षणासाठी आणि नोकरीसाठीच असतो. गुणात्मक विकास हा माणूस घडवण्यासाठी असतो.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

# विलक्षण संख्याशास्त्रज्ञ

**सांख्यिकीतून मिळणाऱ्या माहितीचा विचार करण्याच्या पारंपरिक दृष्टीकोनात आमुलाग्र बदल घडविणारे, अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनच्या शिकागो विभागाने ज्यांचा 'विलक्षण संख्याशास्त्रज्ञ' असा गौरव केला, 'संख्या' या भारतीय सांख्यिकी संशोधनपत्रिकेचे संपादकीय सदस्य, विलक्षण संख्याशास्त्रज्ञ रघुराज बहादूर यांचा सात जून हा स्मृतिदिन. द्विमान वर्गीकरणामध्ये भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करणारी अंडरसन-बहादूर रीत सांख्यिकी आणि अभियांत्रिकीच्या क्षेत्रात कळीची ठरली आहे.**

रघुराज बहादूर यांचा जन्म दिल्ली येथे ३० एप्रिल १९२३ रोजी शिवराज आणि शिवराणी बहादूर यांच्या पोटी झाला. दिल्लीतील सेंट स्टीफन्स महाविद्यालयातून बी. ए. ची पदवी प्रथम श्रेणीत घेतल्यामुळे त्यांना मिळालेली शिष्यवृत्ती उदार मनाने महाविद्यालयातील गरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांनी परत केली. पुढे दिल्ली विद्यापीठातून त्यांनी एम. ए. ची पदवी संपादन केली. त्यानंतर बंगलोरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये एक वर्ष काम केल्यानंतर त्यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाली. मग ते अमेरिकेतील चॅपल हिल येथील नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठात गणितीय सांख्यिकीचा अभ्यास करण्यासाठी गेले आणि दोन वर्षापेक्षा कमी कालावधीमध्ये त्यांनी आपली पीएच.डी. पदवी प्राप्त केली (१९५०). पीएच.डी. साठी त्यांनी निवडलेली समस्या लोकसंख्येशी (पॉपुलेशन) शी संबंधित होती, जी त्यांना हेरॉल्ड हॉटेलिंग यांनी सुचविली होती. तथापि त्यांचे मुख्य मार्गदर्शक हर्बर्ट रॉबिन्स हे होते. आपल्या प्रबंधावर आधारित बहादुर यांनी लिहिलेला शोधनिबंध 'एनल्स ऑफ मॅथेमॅटिकल स्टॅटिस्टिक्स' मध्ये प्रकाशित झाला होता. नंतर ते शिकागो विद्यापीठात रुजू झाले. दरम्यान १९५६ ते १९६१ या काळात कोलकाता येथील भारतीय सांख्यिकी संस्थेच्या संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले, जेथे इतरांसह, अनुमान (इन्फरन्स), अनुक्रमिक विश्लेषण (सिक्वेंशीयल अनालिसिस), मोजमाप-सैद्धांतिक संभाव्यता (मेजर थेरोटीक प्रोबाबिलीटी) आणि संभाव्यता सिद्धांतावरील मर्यादा प्रमेयांसह (लिमिट थेरमस ऑन प्रोबाबिलीटी थेरी) अनेक विषयांवर त्यांची प्रेरणादायी व्याख्याने होत, ज्यांनी तरुण संभाव्यता अभ्यासक आणि गणितीय सांख्यिकीशास्त्रज्ञांची संपूर्ण पिढी संशोधनाच्या सीमेवर नेली. प्रचलित भारतीय वातावरणात ते एक अतिशय असामान्य शिक्षक होते, ज्यांनी आपल्या कोमल बुद्धीचातुर्याने आणि नैतिक मूल्यांकडे बारकाईने लक्ष देऊन, आपल्या सहकाऱ्यांचा आणि तरुण विद्यार्थ्यांचा समान पातळीवर आदर केला आणि ज्यामध्ये नवीन ज्ञानाचा शोध सर्वोच्च असेल, असे वातावरण निर्माण केले होते. १९६१ मध्ये त्यांनी भारतीय सांख्यिकी संस्थेतील प्राध्यापकपदाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला आणि अमेरिकेतील शिकागो विद्यापीठात प्राध्यापक म्हणून कायमस्वरूपी तेथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला तेव्हा भारतातील सांख्यिकीय शिक्षण आणि संशोधनाचे मोठे नुकसान झाले.

संख्याशास्त्रातील महत्वाच्या दोन योगदानासंबंधी बहादूर नावाजले जातात. त्यापैकी पहिले म्हणजे 'पर्याप्तता सिद्धांत' (थेरी ऑफ सफिसीयन्सी). विशाल संख्येत असलेली आधारसामग्री अल्प परंतु पर्याप्त संख्येत घटवली की ती हाताळणे सोपे होते व हवे असलेले प्रतिमान घटवलेली आधारसामग्री सहजतेने वापरता येते, हा त्याचा सारांश. त्यांचे दुसरे योगदान म्हणजे 'बहादुर कार्यक्षमता' (बहादुर इफिसीयन्सी). एखाद्या परिस्थितीत मापनासाठी जर तोडीस तोड अशा अनेकविध पद्धती उपलब्ध असतील तर बहादुर कार्यक्षमता वापरून उत्कृष्ट कामगिरी देणारी पद्धती, संभाव्यतातील विशाल विचरणांच्या आधारे निवडता येते. त्यामुळे अंतिम ध्येय गाठण्यासाठी अनेकांतून एक उत्कृष्ट मापन निवडण्याचे सांख्यिकी-अन्वेषकाचे काम उत्तमरीत्या पार पडते. मापनांची तुलना करण्याकरिता बहादुर कार्यक्षमता चाचपणी सर्वोत्तम मानली जाते. बहादूर यांनी त्यांच्या विशाल विचलनासंबंधातील संशोधनांचा सारांश 'सम लिमिट थेरमस इन स्टॅटिस्टिक्स' या प्रकाशित शोधनिबंधात मांडला आहे. घोष आणि किफर या सहसंख्याशास्त्रज्ञांसमवेत बहादूर यांनी केलेले संशोधन बहादुर-घोष-किफर सादरीकरण म्हणून सुपरिचित आहे. थिओडोर विल्बर अंडरसन आणि बहादूर यांनी द्विमान वर्गीकरणामध्ये भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करणारी रीत (अल्गोरीथम) तयार केली होती, जी अंडरसन-बहादूर रीत म्हणून ओळखली जाते आणि जी सांख्यिकी आणि अभियांत्रिकीच्या क्षेत्रात कळीची ठरली आहे.



गणितिय सांख्यिकीतील योगदानाबद्दल त्यांना १९६८-६९ मध्ये प्रतिष्ठित जॉन सायमन गुगेनहेम शिष्यवृत्ती देण्यात आली. ते इंडियन नॅशनल सायन्स अकादमी, इंडियन अकादमी ऑफ सायन्सेस आणि इन्स्टिट्यूट ऑफ मॅथेमॅटिकल स्टॅटिस्टिक्सचे फेलो होते. ते आंतरराष्ट्रीय सांख्यिकी संस्था आणि अमेरिकन अकादमी ऑफ आर्ट्स अँड सायन्सेसचे सदस्य होते. गणितीय सांख्यिकी संस्थेचे माजी अध्यक्ष आणि माजी वाल्ड व्याख्याते, दिवंगत प्राध्यापक जेर्झी नियमन यांनी १९७४ मध्ये भारतीय सांख्यिकी संस्थेच्या दिल्ली कॅम्पसचे उद्घाटन करताना त्यांचे वर्णन भारतीय वंशाच्या अमेरिकन सांख्यिकी क्षेत्रात सर्वत्र चमकणाऱ्या २५० ताऱ्यांपैकी सर्वात तेजस्वी म्हणून केले होते. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र आदरांजली!

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## 'शिवरत्न' इन्स्टिट्यूटमध्ये शिवराज्याभिषेक दिन साजरा

**अकलूज** : रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने शिवरत्न नॉलेज सिटी परिसरातील शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या शाखेत 'राज्याभिषेक सोहळा दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार हे होते. यावेळी प्रा. सविता उप्पल्ली प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होत्या.प्रा. उप्पल्ली यांनी आपल्या व्याख्यानातून पराक्रमी शिवरायांच्या अंगभूत गुणांचे अनुकरण करण्यास उपस्थित विद्यार्थ्यांना उद्युक्त केले. महाराजांच्या प्रशासनातील कार्यकुशलता, व्यवस्थापन, नियोजन, अष्टप्रधान मंत्रीमंडळाची रचना व कार्यभार, रणनीती इत्यादी मुद्द्यांवर भाष्य केले. या वेळी बीबीए तृतीय वर्गातील विद्यार्थ्यांनी सृष्टी आगलावे व स्नेहा माने यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ३५० वर्षांनंतरही विश्वभरात शिवाजी महाराजांना मॅनेजमेंट गुरू मानत असल्याचे गौरवास्पद बाब आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यालयीन अधिकारी प्रा.भरत साठे यांनी केले. आभार प्रा. वसीम सय्यद यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.नितिन कंगळे, प्रा.कु. स्नेहा धाईंजे, कार्यालयीन सेवक अमोल खरात व आशा लोखंडे यांनी परिश्रम घेतले.



## वीरशैव ढोर समाजातर्फे १२ सदस्यांचा सन्मान

**सोलापूर** : वीरशैव कक्कय्या ढोर समाज ज्येष्ठ नागरिक एकता मंच सोलापूर या सदस्यांचे वाढदिवसाच्या अनुषंगाने सटवाजी शिंदे, अशोक व्होटकर, दौलत शिंदे, अशोक शिंदे, भागवत नारायणकर, अबाजी शिंदे, दत्तात्रेय नारायणकर, गौरीशंकर सोनवणे, गोकुळ व्होटकर, विनोद व्होटकर, धनंजय सोनवणे, महांकाळेश्वर शिंदे इ. यावेळी सनई चौघड्याच्या सुरामध्ये तसेच सटवाजी शिंदे यांचा ७५ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी गौरप्पा कटकधोंड, दत्ता कटके, तुकाराम (महाराज) कोकणे, राजू पोळ, विजयकुमार कटके, दत्तात्रेय इंगळे, दत्तात्रेय शिंदे, चंद्रक़ांत शिंदे, वसंत शिंदे, सतीश नारायणकर, श्यामराव व्होटकर, दयानंद कटके, धोंडीबा नारायणकर, विजय सोनवणे, नागनाथ बोराडे, महेश सोनवणे, जयानंद सोनवणे, रमेश सोनवणे, शंकर इंगळे, नागेश सोनवणे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.



## कामगार संघटनेतर्फे खाडे यांना निवेदन

**सोलापूर** : शहरामध्ये सुमारे ६० ते ७० हजार विडी कामगार आहेत. या कामगारांना किमान वेतन कायदा लागू केला नसल्यामुळे महिला विडी कामगारांचे हाल होत आहे. किमान वेतन लागू करावी या मागणीचे लेखी निवेदन नव महाराष्ट्र कामगार संघटना सोलापूरच्यावतीने कामगारमंत्री सुरेश खाडे यांना देण्यात आले. यावेळी किमान वेतन समिती लवकरात लवकर जाहीर करु, असे मंत्री महोदय यांनी सांगितले. निवेदनप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष सायबण्णा तेग्गेळ्ळी, निशांत तेग्गेळ्ळी, अशोक कांबळे व इतर महिला विडी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठेकेदाराच्या जीवावर मनपा अधिकाऱ्यांची ऐश कशाला?

**शहरात उलट-सुलट चर्चा** | **माजी नगरसेवकांचा नाराजीचा सूर**

सुराज्य/सोलापूर

**उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामावर नियंत्रण आणि निगराणी करण्याच्या उद्देशातून पोचमपाड कंपनीने स्मार्ट सिटीच्या सीईओ तथा महापालिका आयुक्त आणि इतर अधिकारी यांना अलिशान २ गाड्या दिल्या. महापालिका आयुक्तांना महापालिकेची गाडी उपलब्ध असताना मक्तेदार कंपनीने दिलेली अलिशान गाडी वापरावी का?, यावरून आता उलट-सुलट चर्चेला उधाण आले आहे. माजी नगरसेवकांसह अनेकांनी या संदर्भात नाराजी व्यक्त केली आहे.**

अनेक वर्षानंतर उजनी सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम अखेर अनेक विघ्न पार पाडत सुरू झाले. सोलापूर स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन व महापालिका यांच्या माध्यमातून हे काम करण्यात येत आहे. जुना मक्तेदार असलेल्या पोचमपाड कंपनीलाच नाट्यमयरित्या पुन्हा या कामाचा मक्ता देण्यात आला. वर्क ऑर्डर दिल्यानंतर या कंपनीने जॅकवेलसह जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू केले आहे. ११० किलोमीटरचे समांतर जलवाहिनीचे काम आहे.

दरम्यान, सोलापूर स्मार्ट सिटीच्या सीईओ तथा महापालिका आयुक्त आणि मुख्य तांत्रिक अधिकारी व पथकाकडून या कामाची वेळोवेळी नियमितपणे पाहणी व नियंत्रण करण्यात येणार आहे. त्यासाठी पोचमपाड कंपनीने महापालिका आयुक्तांसाठी इनोव्हा क्रिस्टा तर मुख्य तांत्रिक अधिकारी व पथक यांच्यासाठी स्कॉर्पिओ अशा दोन गाड्या दिल्या आहेत. या जलवाहिनीचे काम संपेपर्यंत या गाड्या महापालिका अधिकाऱ्यांच्या दिमतीला राहणार आहेत. दरम्यान, पोचमपाड



कंपनीकडून स्मार्ट सिटी सीईओ तथा महापालिका आयुक्तांसाठी अलिशान इनोव्हा क्रिस्टा गाडी तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यासाठी दिलली आहे. सोमवारी महापालिका आवारात ही गाडी पहावयास मिळाली.

दुहेरी जलवाहिनीच्या कामाच्या निगराणीसाठी ही गाडी दिली असली तरीही दुसरीकडे माजी नगरसेवकांमधून व पदाधिकाऱ्यांमधून या संदर्भात उलट - सुलट चर्चा होत आहे. नाराजीचा सूरही उमटत आहे.

यापूर्वी पोचमपाड कंपनीने हेच दुहेरी जलवाहिनीचे काम हाती घेतले असताना तत्कालिन सीईओ अथवा महापालिका आयुक्तांनी कंपनीची गाडी वापरली नव्हती. तांत्रिक अधिकाऱ्यांना या गाड्या दिल्या जातात. आयुक्त यांना महापालिकेच्या ताफ्यातील गाडीची सुविधा उपलब्ध आहे, असे असताना एखाद्या मक्तेदार कंपनीकडून देण्यात आलेली अलिशान अशी गाडी आयुक्तांनी वापरावी का?, या संदर्भातही नाराजीचा सूर उमटत आहे.

### हा सर्व मिलीभगतचा प्रकार आहे : नरोटे



सर्व भ्रष्ट्राचाराने फोफावले आहे. हा मिलीभगतचा प्रकार वाटत आहे. दुहेरी जलवाहिनीसाठी ४५० कोटीचे टेंडर पूर्वीच निघाले होते. मात्र हे सरकार टेंडर काढतात आणि पैसे खातात असा प्रकार सुरू आहे. अधिकाऱ्यांना गाड्या देणे म्हणजे भ्रष्ट्राचार असल्याचे वाटत आहे. पाणीपुरवठा विस्कळीत आहे, मात्र त्यासाठी महापालिकेचे प्रयत्न नाहीत, जे सत्य आहे ते लोकांसमोर येईल, असे काँग्रेसचे माजी नगरसेवक चेतन नराटे म्हणाले.

### अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठीच : खरादी



पोचमपाड कंपनीचा मक्ता रद्द केला होता. मात्र आर्थिक व्यवहारातून पुन्हा त्याच कंपनीला मक्ता देण्यात आला हे भ्रष्ट्राचारच आहे. या टेंडरची चौकशी झाली आहे. अधिकाऱ्यांना खूष करण्यासाठी कंपनीने गाड्या दिल्या आहेत, अधिकाऱ्यांना गाड्या आहेत, मग गाड्या का दिल्या, यामागे काहीतरी मॅनेज आहे, असे एमआयएमचे माजी नगरसेवक रियाज खरादी म्हणाले.

### नको त्याच गोष्टी पालिकेत : चंदनशिवे



यापूर्वी रस्त्याचे काम करणाऱ्या कंपनीने अधिकाऱ्यांना गाडी दिली होती. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही, नाही त्याच गोष्टीसाठी गाड्याचा वापर झाला. आज प्रभागात निधी नाही, पाणीपुरवठा विस्कळीत आहे. त्याकडे दुर्लक्ष आहे. प्रशासकाचे काम ठोस नाही. लोकांना सुविधा देण्यापेक्षा नको त्याच गोष्टी पालिकेत चालल्या आहेत, असे आनंद चंदनशिवे यांनी सांगितले.



## एस.टी.महामंडळाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार

**लिनेन्स महिला क्लबने कर्मचाऱ्यांचा केला सन्मान**

सुराज्य/अकलूज

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) ७५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून सेवेतून वयोमानानुसार निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाची दखल घेऊन लिनेन्स महिला क्लबच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आला.या कार्यक्रमला प्रमुख पाहुणे म्हणून अकलूज एस.टी आगार व्यवस्थापक प्रमोद शिंदे होते.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी अहोरात्र प्रवाशांचे सेवा करत असतात. त्यामध्ये एस.टीचे. चालक, वाहक, वाहन रिपेअरी करणारे कर्मचारी, वाहतूक नियंत्रण यांचे योगदान मोठे असते.

दररोज प्रवाशांची सेवा करत असताना सेवानिवृत्त वय कधी येते ते या कर्मचाऱ्यांना समजत नाही.वयोमानानुसार शासनाच्या नियमानुसार त्यांना सेवानिवृत्त घ्यावी लागते.पण सतत प्रवाशांची सेवा करणा-या कामगारांची दखल कोणी घेत नाही.पण आज ती उणीव लिनेन्स महिला क्लबच्या महिलांनी या कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभाचे आयोजन करून त्यांच्या कामाची दखल घेतली आहे.

आपल्या आयुष्यातील ३० ते ३५ घालवतात व प्रवाशाच्या सेवेतच धन्यता मानत. निवृत्तीनंतर मिळणाऱ्या चार-पाच हजार निवृत्ती वेतनमध्ये संसाराचा गाडा का हकावा या विवंचनेत हे कर्मचारी असतात. आज सेवानिवृत्त झालेले कर्मचारी चालक विलास कळसुले, विलास शिंदे, अशोक पिसे, गोपाळ सावंत, मनोज इनामके, वाहतूक नियंत्रक तुकाराम राऊत शिपाई अंकुश पाटील, यांत्रिक कर्मचारी आबा पाताळे, जीवन सराटे, मधू नरळे, शब्बीर काझी, आगतराव गळगुंडे या सर्व कर्मचारी सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार लिनेन्स महिला क्लबच्या अध्यक्षा छाया बुराडे, संगीता दोशी, सचिव राजश्री जगताप, सुप्रिया मुदगल, योगिता ओसवाल, संध्या जाधव यांचे हस्ते करण्यात आला. यावेळी अशोक खाडे, उदय दुपडे, विजय रणदिवे, बापू बनसोडे उपस्थित होते.

## पद्मशाली शिक्षण संस्थेच्या नियोजित शैक्षणिक वास्तूचे उद्या भूमिपूजन

सुराज्य/सोलापूर

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या राजमल नारायण बोमडयाल प्राथमिक शाळेच्या नियोजित शैक्षणिक वास्तूचे भूमिपूजन गुरुवार दि. ८ रोजी स्मृती ऑरगॅनिक्सचे जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर स्वप्निल ईगा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

पद्मशाली शिक्षण संस्था ही शिक्षण प्रसार कार्याची शतकोत्तर तपपूर्तीची वाटचाल करणारी सोलापूरातील पूर्व भागातील मोठी शिक्षण संस्था आहे. संस्थेच्या २२ शाखांमधून के जी ते पी जी पर्यंत शिक्षणाची सोय आहे. भाषिक अल्पसंख्याक असलेल्या या संस्थेत मराठी, इंग्रजी, तेलुगु इत्यादी माध्यमातून शिक्षण दिले जाते. तंत्रशिक्षण आणि स्त्री शिक्षणातही संस्थेचे योगदान मोठे व उल्लेखनीय असे आहे. भव्य शिक्षणसंकुलाचा बांधकाम प्रकल्पाचा अंदाजित खर्च रुपये ३ कोटी (तीन कोटी) चा आहे. संकुलाचा तळमजला २४९ चौरस मीटर प्रत्येक मजला हा २५९ चौरस मीटरचा असून अशा तीन मजली इमारतीत प्रत्येकी सहा वर्गखोल्या बांधण्यात येणार आहेत. बांधकामाचे एकूण क्षेत्रफळ ६६३.७६ चौरस मीटर (७१४२ चौरस फूट) इतके होणार आहे. या संकुलात १९x१८ आकाराच्या एकूण १८ वर्गखोल्या आहेत.

या नवीन इमारतीचे बांधकाम १० महिन्यात पूर्ण करण्याचा संस्थेचा मानस आहे. पद्मशाली शिक्षण संस्था ही शिक्षण प्रसार कार्याची शतकोत्तर तपपूर्तीकडे वाटचाल करीत आहे.

संकल्पित इमारतीच्या एका वर्गखोलीसाठी ७ लाख रूपयांची देणगी देणाऱ्यांचे नाव वर्गखोलीच्या दर्शनी भागावर कायमस्वरूपी मार्बल वर नोंदवण्यात येईल. ही देणगी रक्कम दोन देणगीदारांत विभागून ३ लाख ५० हजार रूपये प्रमाणेही देता येईल.

## मडकी वस्तीत तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** :मडकी वस्ती परिसरातील गणेश नगरात राहणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली . ही घटना मंगळवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली .

अजय विकास आष्टुळ (वय २३ रा.गणेश नगर,मडकीवस्ती ) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतला होता . त्याला फासातून सोडवून सिध्दराम कसबे (मावस भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. मात्र तो उपचारापूर्वी मयत झाला . या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही .

## कुमठा नाका परिसरातील सहा घरांना लागली आग

**सोलापूर** : शहरातील कुमठा नाका परिसरातील भारत माता नगर, लिप्रेसी कॉलनी भागातील सहा घरांना मंगळवारी अचानक आग लागली. या आगीत घरगुती, संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. ही घटना मंगळवारी पहाटेच्या सुमारास घडली.

सोलापूर शहरात भारतमाता नगर आहे. या नगरात पत्राशेडमध्ये राहणारे अनेक कुटुंब आहेत. दरम्यान, मंगळवारी पहाटे २ वाजून ४८ मिनिटांनी आगीची घटना घडली.

या घटनेची माहिती मिळताच सोलापूर



महानगरपालिका अग्निशामक दलाच्या सहा गाड्या घटनास्थळावर दाखल झाल्या.

वारे जोरात वाहू लागल्याने आग मोठया प्रमाणात भडकू लागली होती.मात्र अग्निशामक दलाच्या जवानांनी अर्धा तासात आगीवर नियंत्रण मिळविले.या घटनेत भारत माता नगरातील सायराबानो तनुजा चोपदार, तनोजा जाकीर फकीर पीर, रोशन रोहित बोराडे याच्या घरात राहणारे भाडेकरू रेणुका अशोक अडगळे, लक्ष्मण सिद्राम बोराडे याच्या घरात राहणारे भाडेकरू बशीर तेलंगी याशिवाय अल्ताफ बागवान, आफ्रीन ईस्माईल शेख यांच्या घरातील संसारोपयोगी साहित्य, पंखे, फ्रीज, कुलर, भांडी आदी विविध घरगुती साहित्य जळून खाक झाले आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सोलापूर** : शेजारी असल्याची संधी साधून अल्पवयीन मुलीवर प्रेमाचे जाळे टाकून ओळख वाढवली आणि लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केला. यातून पीडिता गरोदर असल्याचे डॉक्टरांच्या तपासणीत निष्पन्न झाले.६,१५,२७ फेब्रुवारी या दिवशी ही घटना घडली. या प्रकरणी सागर नागनाथ तुकमाळी (वय-२१) या तरुणाविरुद्ध बाललैंगिक छळ कायद्यान्वये गुन्हा नोंदला आहे. यातील पंडिता आरोपीच्या घराजवळ राहण्यास आहे.आरोपीने तिची ओळख वाढवून तिला लग्न करण्याचे आमिष दाखवले. ६ फेब्रुवारी रोजी 'तु मला आवडतेस, मी तुझ्याशी लग्न करणार आहे' असे सांगून तिच्याशी जबरदस्तीने संबंध ठेवले.असा प्रकार १५ व २७ फेब्रुवारी २३ रोजीही घडला.एके दिवशी आईने आरोपीकडे का जातेस म्हणून रागावल्याने दोघांचे बोलणे बंद झाले.यानंतर तीन महिन्यापासून मासिक पाळी न आल्याने पिडितेच्या आईने तिला डॉक्टरांकडे नेऊन तपासले असता ती गरोदर असल्याचे निष्पन्न झाले. पिडितेच्या आईने यासंबंधी विचारणा केल्यानंतर तिने आरोपीने जबरदस्तीने अत्याचार केल्याचे सांगितले.यावरुन पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवल्याने सागर तुकमाळी याच्याविरुद्ध गुन्हा नोंदला आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सोलापूर** : एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना सोलापुरात नुकतीच उघडकीस आली . या प्रकरणात सदर बझारच्या पोलिसांनी लखन अप्पा वायकुळे (वय २१ रा.परंडा जि.धाराशिव) याच्याविरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून तो गुन्हा उस्मानाबाद पोलिसांकडे वर्ग केला आहे. लखन वायकुळे याने धाराशिव परिसरातील एका अल्पवयीन मुलीवर मार्च २०२३ अत्याचार केला होता . ती मुलगी सोलापुरात उपचारासाठी दाखल झाली असता हा प्रकार उघडकीस आला . त्याप्रमाणे पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो गुन्हा उस्मानाबाद पोलीसांकडे वर्ग केला.

### गुन्हे शाखेकडून चार मोटारसायकली जप्त

**सोलापूर** : शहर परिसरात मोटारसायकली चोरणाऱ्या चोरट्याने शहर गुन्हे शाखेच्या पोलीसांनी अटक करून चोरीच्या ४ मोटारसायकली जप्त करण्यात यश मिळवले.गणेश प्रभाकर चलमेटी (वय-२३, रा, अशोक चौक नरसिंग दासरी यांच्या घरात भाड्याने सोलापूर) असे आरोपींचे नाव आहे. याने जेलरोड मध्ये ३ अणि विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ अशा चार मोटारसायकली चोरी केल्याचे उघड झाले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज मधून तपासणी केल्यावर गणेश चलमेटी हा त्यामध्ये दिसून आल्याने त्याला ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने मोटारसायकली चोरी केल्याचे कबुल करून चोरीच्या ४ मोटारसायकली पोलीसांना काढून दिल्या. त्याला अटक करण्यात आली असून ही कामगिरी सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, हवालदार अनिल जाधव, महेश शिंदे, राजु मुदगल, कुमार शेळके, सैपन सय्यद, सिध्दाराम देशमुख, प्रकाश गायकवाड, वसिम शेख, सतीश काटे यांनी केली.

# शहरातील विविध शाळांचे दहावी परीक्षेत यश

## राज मेमोरियल स्कूलचा दहावीचा निकाल ९९.३५ टक्के

सुराज्य/सोलापूर

जुनी मिल कंपाऊंड येथील राज मेमोरियल इंग्लिश स्कूलचा इ. १०वीचा निकाल ९९.३५ टक्के लागला आहे. म. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेमार्फत



२०२२-२३ या शैक्षणिक वर्ष १०वीचा निकाल जाहीर करण्यात आला होता. सदर निकालात शाळेतील विद्यार्थी अथर्व हरिप्रसाद आडकी (९४.६० टक्के प्रथम), अनुष्का धनंजय सोनवणे (९४ टक्के द्वितीय), रचना संजय धनवे (९३.६० टक्के तृतीय) गुण मिळाले. चतुर्थ क्रमांक ज्ञानेश्वरी अनिल शिंदे (९३.२० टक्के) अल्फिया ईलाही मोगल (९३.६० टक्के) गुण मिळवत ५ वा क्रमांक पटकावला. सहा विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्यासह यश संपादन केले तसेच प्रथम श्रेणीमध्ये ३८ विद्यार्थ्यांनी तर द्वितीय श्रेणीमधील ४३ विद्यार्थ्यांनी यश संपादन करत शाळेच्या ९९.३५ टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थाअध्यक्ष महेश कोठे, डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्रा. विलास बेत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा, तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

### पोस्ट बेसिक आश्रम प्रशाला

पोस्ट बेसिक आश्रम प्रशाला बोरोटी (बु.) या शाळेत सिमरन गुलाब जमादार हिने ८१.१० टक्के गुण प्राप्त करुन प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. रविना चव्हाण यांनी ८० टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर शुभम अशोक ढंगापुरे यांनी ८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. ग्रामीण भागात कोणतेही व्होकेशन, कोचिंग, क्लासेस नसतानाही वरील विद्यार्थी हे चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल ग्रामस्थांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

### नॅशनल उर्दू हायस्कूलचा दहावीचा १०० टक्के निकाल

मार्च २००२३ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून यात प्रथम कलादगी अतीका ९१.४० टक्के, द्वितीय फुलारी साकीब ८८.८० टक्के व तृतीय शेख समरीन ८८.६० टक्के घेऊन उत्तीर्ण झाले. प्रशालेतून एकूण ७२ विद्यार्थी परीक्षेस बसलेले होते. यात विशेष प्राविण्यासह ५३ व १९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव डॉ. आदम, संस्थेचे अध्यक्ष ॲड. यु. डी. जहागीरदार, उपाध्यक्ष आसीफ शेख, मुख्याध्यापिका डोंगरी जे. एफ तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे...

### विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूलचे यश

मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत इंडियन मॉडेल स्कूल संचलित स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला आहे. गौर अथर्व संतोषानंद हा विद्यार्थी ९५.४० टक्के गुण घेऊन शाळेत प्रथम आला आहे. ओंकार रमेश वाघमारे ९५.४० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक व वेदांत रमेश बोद्दूल ९४.४० टक्के गुण घेऊन शाळेत तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. शाळेतील तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. स्वामी विवेकानंद पोलीस पब्लिक स्कूलचे अध्यक्ष पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, एसीपी (अॅडमिन) दीपक आर्वे, प्रा. ए. डी. जोशी, अमोल जोशी, सायली जोशी, ममता बसवंती, मुख्याध्यापिका स्वाती करांडे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हे बघा फादर, मला जमल तेवढच करेन !!!

कल्याण
267-58-224

मेन बाजार
----------

# ‘पीएम कुसूम’ योजनेला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद

## दिवसा शेतीला पाणी सिंचनासाठी सौर ऊर्जेचे बळ

सुराज्य/सोलापूर

शेतीला दिवसा पाणी देण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणामार्फत (महाऊर्जा) राबवण्यात येणाऱ्या पंतप्रधान कुसुम’ योजनेतून सौर कृषीपंप घेण्यासाठी राज्यभरातून २३ हजार ५८४ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यात सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक १,४५०अर्जदारांचा समावेश आहे. एकाच वेळी अनेक शेतकरी महाऊर्जा कुसुम’ योजनेच्या संकेतस्थळावर अर्ज करत असल्याने त्यावर प्रक्रिया होण्यास विलंब लागत आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी महाऊर्जा’कडून जिल्हानिहाय कोटा वाढवून देण्यात येत आहे.

शेतीचे सिंचन करणाऱ्या कृषीपंपांना सौर ऊर्जेचे बळ देण्यासाठी केंद्र सरकारकडून पंतप्रधान किसान ऊर्जा सुरक्षा व उत्थान योजना’ (पीएम-कुसुम) राबवली जाते. त्या अंतर्गत केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने राज्यात दर वर्षी एक लाख याप्रमाणे आगामी पाच वर्षांत पाच लाख सौर कृषीपंप बसवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या योजनेत सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्याला सौर कृषीपंपाच्या किमतीच्या ९० टक्के व अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याला सौर कृषीपंपाच्या किमतीच्या ९५ टक्के अनुदान देण्यात येते. त्यासाठी महाऊर्जा’मार्फत १७ मेपासून कुसुम योजने’चे संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले असून, जिल्ह्याच्या लोकसंख्येनुसार उपलब्ध कोट्यात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य’ या तत्त्वावर सौर कृषीपंप उपलब्ध करून दिले जात आहेत. त्याला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभत असून, एकाच वेळी अनेक शेतकरी अर्ज करत असल्याने संकेतस्थळ ठप्प होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर महाऊर्जा’मार्फत संकेतस्थळाचा दररोज आढावा घेऊन जिल्हानिहाय कोटा वाढवून दिला जात आहे. त्यामुळे सौर कृषीपंपांच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांनी कोटा उपलब्ध झाल्यावर अर्ज करावा, असे आवाहन महाऊर्जा’चे महासंचालक रवींद्र जगताप यांनी केले आहे.



### असा आहे लाभार्थ्यांचा हिस्सा

- पंपाची क्षमता पंपाची किंमत (जीएसटीसह) सर्वसाधारण प्रवर्गाचा हिस्सा (१० टक्के) अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गाचा हिस्सा (पाच टक्के)
- तीन एचपी १,९३,८०३ रुपये १९,३८० रुपये ९,६९० रुपये
- पाच एचपी २,६९,७४६ रुपये २६,९७५ रुपये १३,४८८ रुपये
- साडेसात एचपी ३,७४,४०२ रुपये ३७,४४० रुपये १८,७२० रुपये

### बनावट संकेतस्थळावर अर्ज करू नका

शेतकऱ्यांच्या कृषीपंपांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीजपुरवठा करण्यासाठी राज्य सरकारकडून पीएम-कुसुम’ योजनेला गती दिली जात आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीच्या आकारानुसार तीन, पाच आणि साडेसात अश्वशक्ती क्षमतेचे पारेषण विरहित सौर कृषीपंप देण्यात येतात. अडीच एकरपर्यंत शेतीसाठी तीन अश्वशक्ती, पाच एकर शेतजमिनीसाठी पाच अश्वशक्ती व त्यापेक्षा जास्त शेतजमीनधारकाला साडेसात अश्वशक्ती क्षमतेचे सौर कृषीपंप दिले जातात. त्यासाठी शेतकऱ्यांनी महाऊर्जा’च्या संकेतस्थळावरूनच ऑनलाइन अर्ज करावा, इतर कोणत्याही बनावट किंवा फसव्या संकेतस्थळाचा वापर करू नये; तसेच अर्ज करताना येणाऱ्या अडचणींबाबत ०२०-३५०००४५६ किंवा ०२०-३५०००४५७ या क्रमांकांवर तक्रार नोंदवावी, असे आवाहनही महाऊर्जा’ने केले आहे.

# रमाई घरकुल योजना लाभार्थ्यांनी बांधकाम पूर्ण न केल्यास कारवाई

## महापालिका नगर अभियत्यांचा इशारा

सुराज्य/सोलापूर


शहरातील रमाई घरकुल योजनेतील अनुदान प्राप्त लाभार्थ्यांनी तत्काळ बांधकाम पूर्ण करावे अन्यथा अपहर प्रकरणी कायदेशीर व जप्तीची कारवाई करण्यात येईल, अशा इशारा महापालिका नगर अभियंता यांनी केले आहे.

रमाई आवास योजने अंतर्गत सोलापूर शहरात घरकुल बांधकामापोटी लाभार्थ्यांना अनुदान वितरण झाले आहे. अशा पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचे काम पूर्ण करावे म्हणून पत्र दिले आहे परंतू अद्यापही घरकुल बांधकाम सुरु केलेले नाही किंवा पूर्ण केलेले नाही.

जे लाभार्थी अनुदान घेऊनही अद्यापपर्यंत काम सुरु केलेले नाही अशा पात्र लाभार्थी यांनी एका आठवड्याच्या आत घरकुलाचे बांधकाम सुरु करावे अन्यथा अनुदानाचा अपहार केला म्हणून कायदेशीर कारवाईपोटी सक्तीने जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. त्यास संपूर्णपणे लाभार्थी जबाबदार राहील.

### आतापर्यंत २ हजार ५१२ घराचे काम पूर्ण

राज्य शासनाच्या समाज कल्याण विभागाअंतर्गत रमाई आवास योजनेत सोलापूर शहरात एकूण ३ हजार ३५४ घरे मंजूर आहेत. त्यापैकी ११ वर्षात आत्तापर्यंत २ हजार ५१२ घराचे काम पूर्ण झाले आहे. दरम्यान, रमाई घरकुल योजनेचा पहिल्या हप्त्याचे अनुदान न घेतलेल्या जुन्या पात्र लाभार्थ्यांना महापालिका नगर अभियंता विभाग प्रशासनाकडून नोटीसा बजावण्यात आल्या होत्या.



## भोसले यांच्या नेतृत्वाखाली समृद्ध अन्नछत्र होतेय : देशमुख

**अक्कलकोट** : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली समृध्द अन्नछत्र होत असून, परिसरात असलेली स्वच्छता भक्तीपूर्ण वातावरण, पर्यावरण पूर्वक आखणी-मांडणी, यांसह स्वामी भक्त प्रिय कार्य असल्याचे मनोगत दीपक फर्टीलायझर पेट्रोल केमिकल्सचे एज्युकेटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट सीएनबी व सेल्स अँड मार्केटिंगचे प्रमुख नरेश देशमुख यांनी व्यक्त केले.ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत पत्नी सौ. सुजाताताई देशमुख, चि. राज देशमुख व अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती आप्पासाहेब पाटील, महेश पाटील हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, उपाध्यक्ष अभय खोबरे, विश्वस्त संतोष भोसले, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, विराज माणिकशेट्टी, निखिल पाटील, प्रवीण घाटगे, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## मंदिराच्या संभामंडपासाठी निधी देऊ : आ.पडळकर

**दक्षिण सोलापूर** : विविध मंदिराचे सभामंडप उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊ, असे आश्वासन विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी दिले. रविवारी हत्तूर येथे शिवसेना जिल्हा(शिंदे गट) उपप्रमुख अण्णप्पा सतुबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी आमदार पडळकर बोलत होते. ते म्हणाले, धनगर समाजावर आजपर्यंत अन्याय झाला आहे. यापुढे धनगर समाजावर अन्याय होणार नाही. यापुढे त्रास सहन केला जाणार नाही. आपण अण्णाप्पा सतुबर यांच्या पाठिशी खंबीरपणे उभा आहोत. प्रारंभी आमदार पडळकर यांचे धनगर समाजाकडून जंगी स्वागत आणि सत्कार करण्यात आला. यावेळी मंद्रूपच्या मदगोंडेश्वर मठाचे मठाधिपती आमसिध्द पुजारी महाराज, कल्लाप्पावाडी येथील मठाचे अमोगसिध्द महाराज , दक्षिण सोलापूर तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सदाशिव व्हनमाने, डॉ. नानासाहेब अर्जुन, अमोलबापू कारंडे, गजानन शेंडगे, रमेश कोकरे, सोसायटीचे अध्यक्ष भिमाशंकर सतूबर, सोमनिंग कनपवडीयार, प्रशांत सलगरे,भिमाशंकर कनपवडीयार, बिळेणी पटेवडीयार, बिळेणी कनपवडीयार, अमोल हिरकूर, उमेश मळेवाडी, ज्योत्यप्पा सिनेवडीयार, रमेश सतुबर, ओगसिध्द जनगे, राजकुमार कनपवडीयार, हत्तरसंगचे सरपंच धर्मराज पुजारी, राजकुमार हालिमनी, राजकुमार उपासे, शिवानंद निर्वाणी, विलास जरग, रेवणसिध्द शेळके,सर्जू बंने, बनू पटेवडियार, सोमा वाघमोडे,सोमनिंग व्हनमाने यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# सिव्हीलमध्ये तीन महिन्यात सिटीस्कॅनची सोय

## आमदार प्रणिती शिंदे त्यांनी घेतली प्रधान सचिवांची भेट

सुराज्य/मुंबई



मुंबई दि. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय सोलापूर येथील बंद अवस्थेत असलेली सिटीस्कॅन मशीन तत्काळ दुरुस्त करावी अथवा नवीन सिटीस्कॅन मशीन उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी आमदार प्रणिती शिंदे यांनी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी जोशी यांची भेट घेतली यावेळी त्यांच्यासोबत सोलापूर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक बाबा मिस्त्री उपस्थित होते.

श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे सोलापूर शहर-जिल्हा व सभोवतालच्या कर्नाटक व इतर जिल्ह्यातून बहुसंख्य गोर-गरीब रुग्ण उपचाराकरीता येत असतात. परंतू रुग्णालयामधील सिटीस्कॅन मशीन बंद असल्यामुळे रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. खाजगी रुग्णालयात सिटीस्कॅन करण्याकरीता भरमसाठ पैसे द्यावे लागतात.

रुग्णांची कौटुंबिक परिस्थिती हलाकीची असल्यामुळे ते खाजगी रुग्णालयात सिटीस्कॅन करू शकत नाहीत. या शासकीय रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन दुरुस्त करणे अथवा नविन मशिन उपलब्ध करुन देण्यात यावेत अशी मागणी रुग्णांच्या नातेवाईकांन कडून होत होती.

याबाबत आमदार प्रणिती शिंदे यांनी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती अश्विनी जोशी यांची भेट घेवून निवेदन दिले असता सकारात्मक प्रतिसाद देत श्रीमती अश्विनी जोशी यांनी तीन महिन्यांमध्ये नवीन सिटीस्कॅन मशीन सोलापूर सिव्हील हॉस्पिटल येथे रुग्णांना उपलब्ध करून दिली जाईल किंवा जुनी असलेली सिटीस्कॅन मशीन दुरुस्त करून सामान्य रुग्णांच्या सेवेमध्ये उपलब्ध करून दिली जाईल असे आश्वस्त केले त्यामुळे सोलापूर सिव्हिल येथे रुग्णांसाठी लवकरच सिटीस्कॅन ची सुविधा उपलब्ध होणार आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सोलापूर** : एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना शहरात नुकतीच उघडकीस आली.या प्रकरणात पोलिसांनी सागर नागनाथ तुकमाळी (वय २१ रा. सोलापूर) बाललैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल करून नुकतीच अटक केली.त्याला चार दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश विशेष न्यायालयाने मंगळवारी दिला. सागर तुकमाळी या तरुणाने त्या अल्पवयीन मुलीला प्रेमाचे नाटक करून फेब्रुवारी महिन्यात अत्याचार केले होते. त्यात ती गर्भवती झाल्याचे निष्पन्न झाले. पीडित मुलीने शहर पोलिसात नुकतीच फिर्यादि दिली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली.



# घनकचरा विभागाकडून स्वच्छता मोहीम

सुराज्य/सोलापूर

महानगरपालिकांतर्गत माझी वसुंधरा अभियान व राष्ट्रीय स्वच्छ वायू उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा परिसर अशा २८ ठिकाणी घनकचरा विभागाकडून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

शहरातील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी उद्यान विभागाकडून केगांव परिसरातील पिकनिक स्पॉट येथे शहरातील पर्यावरणप्रेमी संस्थाचे माध्यमातून प्रतिनिधिक स्वरूपात १०१ रोपांची लागवड करण्यात आली.

कार्यक्रमास उपायुक्त मच्छिंद्र घोलप, पर्यावरण अधिकारी तथा सहाय्यक उद्यान अधीक्षक स्वप्नील सोलनकर, घनकचरा विभागाचे अधिकारी नागेश मेंडगुळे, नागनाथ बिराजदार, दिलीप भामरे, इको फ्रेंडली क्लबचे संस्थापक, वसुंधरा मित्र परशुराम कोकणे, समन्वयक अजित कोकणे, सदस्य सरस्वती कोकणे गंगुबाई कोकणे, किशोरी शहा, अक्षया शहा, देवाशीष शहा, रविकांत प्याटा, शैलजा घाटे, आराध्या कोकणे आदी निसर्गप्रेमी उपस्थित होते.

मिशन लाईफ अंतर्गत नागरिकांमध्ये दैनंदिन जीवनात पर्यावरण पूरक जीवनशैलीचा अवलंब होणेकामी शहरातील विविध होर्डींगवर बेनर लावून पर्यावरणपूरक संदेश देण्यात आला.

### १२५ आस्थापनाची तपासणी; २० हजारांचा दंड

शासनाचे निर्देशानुसार सिंगल युज प्लास्टिक बंदी मोहीम प्रभावीपणे राबविणेत येऊन शहरतील बाजारपेठा, मंडई, मॉल व हॉटेल येथे आरोग्य निरीक्षकांच्या माध्यमातून एकुण १२५ आस्थापनाची तपासणी करण्यात आली असता २० हजार इतकी दांडात्मक रक्कम वसुल करण्यात आली.

## विवाहितेचा छळ; सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर** : माहेरून ४ लाख रूपये घेवून ये म्हणून सासरच्या लोकांनी विवाहितेचा शारीरीक व मानसिक छळ केल्याचे उघड झाले.लक्ष्मी सुरज चन्ना (वय २४, रा. ३८१, ओंकार दुकानासमोर किसान संकुल अक्कलकोट रोड सोलापूर) असे पिडीत विवाहितेचे नाव आहे. हिचा विवाह सुरज चन्ना याच्याशी झालेला असताना लग्नाच्या काही दिवसापासूनच पती सुरज, सासू लता, सासरे आंबादास, दीर सागर, नणंद पुजा मासन,नितीन मासन (सर्व रा. जुना विडी घरकुल सोलापूर) यांनी संगनमताने त्रास दिला माहेरून ४ लाख रूपये घेवून ये तू आमच्या विरूध्द पोलीसांकडे तक्रार देवू नको नाहीतर तुला नांदवणार नाही असे म्हणून शिवीगाळ करून लाथाबुयाने मारहाण केले आणि चाकूने हातावर मारून जखमी करीत शारीरीक व मानसिक छळ केला त्या त्रासाला कंटाळून दि. १ जून रोजी लक्ष्मी हिने फिनेल पिवून आत्महत्येचा प्रयत्न केला अशी नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली असून पुढील तपास पोलीस नाईक कांबळे करीत आहेत.

## डॉक्टरांचे अपहरण करून खंडणीची मागणी; सात आरोपी निर्दोष

सुराज्य/सोलापूर

डॉ.अनिल व्यंकटेश कुलकर्णी यांचा अपहरण करूण त्यांना गावठी बंदूकीचा धाक दाखवून रक्कम मागणी केल्याप्रकरणी आरोपी मुराद हनीफ शेख, भारत दत्तात्रय गायकवाड, विकास सुभाष बनसोडे, रामचंद्र बालाजी कांबळे, रोहित राजू वैरळ,वैभव प्रविण कांबळे, सिध्दार्थ उत्तम सोनवणे यांची सोलापूर येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश डॉ. शब्बीर अहमद औटी यांनी वरील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

दि.२१ सप्टेंबर २०२१ रोजी फिर्यादी हे नेहमीप्रमाणे सोलापूर येथून वडाळा येथे व्यवसायाकरीता गेले होते.त्यानंतर वडाळा येथील वैद्यकीय व पेट्रोल पंपाचे कामकाज आटोपून रात्री ८ च्या सुमारास वडाळा येथून फिर्यादीचे पेट्रोल पंपावर दिवसभर विक्री झालेल्या डिझेल व पेट्रोलची रक्कम ५ लाख ७० हजार ४२० रुपये घेऊन त्यांच्या ताब्यातील कार मधून निघाले.त्यावेळी बार्शी-सोलापूर रोडचे काम चालू असल्याने रानमसले बीबीदारफळ मार्गे निघाले होते.रात्री ८.३० वा. सुमारास बीबी दारफळ गावाच्या पुढे आले नंतर एमआयडीसीच्या क्रॉस रोडवर एक इनोव्हा गाडी फिर्यादीच्या कारच्या आडवली लावली.त्यामधील ४ इसम खाली उतरले त्यापैकी एक इसमाच्या हातात गावडी बंदूक, कोयता, हॉकी स्टीक फिर्यादीस दिसले. फिर्यादीच्या डोक्यास बंदूक लावून इंदापूर येथे घेवून गेले. फिर्यादीस दोन कोटी रूपयाची मागणी केले व त्यानंतर फिर्यादीस माळेवाडी, पुणे येथे ब्रिज वर सोडून दिले वगैरेची फिर्याद फिर्यादीने दाखल केलेली होती. गुन्हयाचे कामी न्यायालयासमोर आलेला पुरावा, तसेच जबाबामध्ये आलेला तफावत व आरोपीतर्फे आरोपींचे वकीलांनी ओळख परेड बाबत केलेला युक्तवाद ग्राहय धरून आरोपींची सबळ पुराव्याअंती निर्दोष मुक्तता केली.

आरोपी मुराद हनीफ शेख तर्फे ॲड. ईस्माइल एन. शेख, ॲड. सिराज आर. शेख, ॲड. वसीम एल. शेख, ॲड. अंबिका एन. जाधव व इतर आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने, साजिद बागवान,अझमोदीन शेख यांनी काम पाहिले व सरकारतर्फे गुंडे वकील यांनी काम पाहिले.

# माजी आमदार रमेश कदम यांना जामीन मंजूर

सुराज्य/सोलापूर



बोगस लाभार्थीच्या नावे कर्ज काढून महामंडळाची फसवणूक केल्याप्रकरणी माजी आमदार रमेश कदम यांना जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.एन.पांढरे यांनी जामीन मंजूर केला.

दरम्यान, माजी आमदार रमेश कदम यांची आजी बायम्मा गणपत क्षीरसागर (रा. नांदणी, ता. बार्शी) हिच्या नावे दुग्धव्यवसाय करण्यासाठी बेकायदेशीररित्या कर्ज मंजुरीचे आदेश काढून ते वितरण करण्यासाठी कर्मचाऱ्यांवर दबाव आणला.त्यातून शासनाची व महामंडळाची सहा लाख ३६ हजार ६५८ रुपयांची फसवणूक केली,अशा आशयाची फिर्याद अनिल राघोबा म्हस्के यांनी ३१ मे २०१% रोजी सोलापुरातील सदर बझार पोलिस ठाण्यात दिली होती. त्यावेळी पोलिसांनी रमेश कदम यांना अटक करून न्यायालयात हजर केले होते. त्यावेळी माजी आमदार रमेश कदम यांनी ॲड.मिलिंद थोबडे यांच्या मार्फत जामीन मिळावा म्हणून न्यायालयात अर्ज दाखल केला होता. अर्जाच्या सुनावणीवेळी ॲड.मिलिंद थोबडे यांनी आपल्या युक्तिवादात फिर्याद उशिराने दाखल झालेली आहे,तसेच कर्ज मंजुरीची रक्कम ही देखील लाभार्थी बायम्मा क्षिरसागर हिच्या खात्यामधून फ्रीझ केलेली आहे.तसेच या प्रकरणाचा तपास आता पूर्णत्वात आला असल्याचा युक्तिवाद मांडला. तो युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायाधीशांनी ५० हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर रमेश कदम यांना जामीन मंजूर केला. अर्जदारतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे ॲड.अल्पना कुलकर्णी यांनी काम पाहिले.अर्जाच्या सुनावणीवेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनी आपल्या युक्तिवादात फिर्याद उशिराने दाखल झालेली आहे, तसेच कर्ज मंजुरीची रक्कम ही देखील लाभार्थी बायम्मा क्षिरसागर हिच्या खात्यामधून फ्रीझ केलेली आहे. तसेच या प्रकरणाचा तपास आता पूर्णत्वात आला असल्याचा युक्तिवाद मांडला.

### महिलेचे ८७ हजाराचे सोन्याचे गंठण ठेवलेली पर्स पळवली

एसटी स्टँड ते कोहिनूर अपार्टमेंट दरम्यान फिर्यादी उषा शंकर काळे (वय-६६, रा.कोहिनूर अपार्टमेंट, रुबी नगर, जुळे सोलापूर) यांच्या बॅग मधील ८७ हजार पाचशे रुपये किमतीचे ३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण ठेवलेली पर्स अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

ही घटना १ ते ३ जून च्या दरम्यान एसटी स्टँड ते कोहिनूर अपार्टमेंट दरम्यान घडली.याप्रकरणी उषा काळे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### टेम्पोला धडकून मोटारसायकलस्वार जखमी

शेळगी पुलावर रस्त्यावर धोकादायक उभी असलेल्या टेम्पोला धडकून मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाले. हा अपघात दि. ९ मे रोजी झाला.सचिन बाबासाहेब देशमुख (वय ४३, रा. १/५२, अंत्रोळीकर नगर होटगी रोड सोलापूर) हे त्यांच्या एम एच १३ डी ए १७६८ या मोटारसायकलवरून चैतन्य क्षिरसागर यासोबत जात असताना शेळगी पुलावर संतोष महादेव फडतडे (वय ४१, रा. बक्षीहिप्परगा ता.दक्षिण सोलापूर) याने त्याच्याकडील एम एच १२ एसएस ६७७६ ही टेम्पो पंमचर काढण्यासाठी रस्त्यावर धोकादायक पध्दतीने उभी केलेली असताना पाठीमागून मोटारसायकल येवून धडकली त्यामध्ये चैतन्य क्षिरसागर हा गंभीर जखमी झाला यावरून टेम्पोचालकाविरूध्द जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक फौजदार दुधाळ करीत आहेत.


## जाहिरातीचा मसुदा

**महाराष्ट्र शासन**

**महिला व बाल विकास विभाग**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व सुधारित अधिनियम २०२१ नुसार तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील तरतुदीनुसार मुंबई शहर -१, मुंबई उपनगर-१, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, ठाणे, धुळे, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली व भंडारा या जिल्ह्यामध्ये अध्यक्ष/सदस्य, बाल कल्याण समिती तसेच मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, गडचिरोली व नागपूर या जिल्ह्यामध्ये सदस्य, बाल न्याय मंडळातील रिक्त पदांसाठी विहीत पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या अशासकीय सदस्यांच्या नियुक्ती करिता पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | समितीचे नाव | पदाचे नाव | जिल्ह्याचे नाव |
| --- | --- | --- | --- |
| १ | बाल कल्याण समिती | अध्यक्ष | मुंबई शहर, मुंबई उपनगर, कोल्हापूर. |
| २ | बाल कल्याण समिती | सदस्य | मुंबई शहर, मुंबई उपनगर, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, ठाणे, धुळे, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली व भंडारा. |
| ३ | बाल न्याय मंडळ | सदस्य | मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, गडचिरोली व नागपूर. |

सदर जाहिरातीबाबतची जिल्हानिहाय नियुक्त करावयाची पदे या याबाबची माहिती, पात्रता, अटी व शर्ती याबाबतच्या अधिक माहितीसाठी शासनाच्या www.mahashtra.gov.in व आयुक्तालयाच्या www.wcdcommpune.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

सही/-
(विश्वजीत माने) भा.प्र.से.
आयुक्त
महिला व बाल विकास
महाराष्ट्र राज्य, पुणे

DGIPR -ROC-C1220

# आंतरजातीय जोडप्यांचे करोडो रुपयांचे अनुदान रखडले

## चार वर्षापासून १७५ लाभार्थी कार्यालयाकडे मारतात चकरा

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा परिषद मधून चालवण्यात येणाऱ्या समाज कल्याण विभागात आंतरजातीय विवाह प्रोत्साहन निधी आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना दिला जातो केवळ समाज कल्याणच्या गलथान कारभारामुळे.हा निधी मागील चार वर्षापासून मिळाला नसून जवळपास १७५ लाभार्थी आजही या या लाभापासून वंचित आहेत.

आंतरजातीय विवाह करण्याचे प्रमाण मागील दोन-तीन वर्षापासून मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मात्र तशा पद्धतीने समाज कल्याण कार्यालयाकडून या जोडप्यांना सहकार्य मिळत नाही .खरे तर समाज कल्याण खात्याने यामध्ये जास्त इंटरेस्ट दाखवायला हवा. परंतु तसे होताना दिसत नाही .कारण मागील चार वर्षापासून जवळपास १७५ जोडपे आपल्याला लाभ मिळावा म्हणून कार्यालयाकडे चकरा मारत आहेत .समाज कल्याण खात्याकडून प्रत्येक जोडप्याला प्रोत्साहन पर प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचे अनुदान दिले जाते .हे अनुदान



चार वर्षात केवळ ५० लाभार्थ्यांना देण्यात आले आहे . तर उर्वरित १७५ लाभार्थी अजूनही या लाभापासून वंचित आहेत. या लाभार्थ्यांना केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत केली जाते .मात्र गेल्या तीन चार वर्षात केंद्राने राज्याला एकही रुपया दिला नसल्याचे सांगण्यात आले .तर राज्य शासनाने मागच्या सहा महिन्यापूर्वी ५० लाख रुपये मंजूर केले होते .त्यातून ५० लाभार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार वाटप करण्यात आले. उर्वरित १७५ दापत्य अजूनही बाकी असून दररोज समाज कल्याण ला हे लाभार्थी चकरा मारत आहेत. मात्र लाभार्थी गेल्या चार वर्षापासून दूरवरून खर्च करून येतात त्यामुळे या जोडप्यांना विनाकारण आर्थिक भूर्दंड बसत आहे. समाज कल्याण खात्याने वारंवार पाठपुरावा केला असता तर चार वर्षाची थकीत देयके लाभार्थ्यांना वेळेतच मिळाली असत मात्र जिल्हा परिषद समाज कल्याण च्या गहाळ कारभारामुळे कोट्यवधींचे लाभ देण्याचे बाकी असल्याने लाभार्थ्यांमध्ये निराशा जनक वातावरण असल्याचे अनेक लाभार्थ्यांनी बोलून दाखवले.

> मध्यंतरी कोरोनाचा काळ असल्याने पैसे येण्यास विलंब झाला असून पैशाची मागणी केंद्र आणि राज्य शासनाकडे केलेली आहे . हा निधी प्राप्त होताच निधीचे वाटप लाभार्थ्यांना करण्यात येणार आहे. जवळ जवळपास तीन कोटी रुपयांची मागणी केली असून तशा पद्धतीचा आमचा पाठपुरावा सुरू आहे.
>
> **– सुनील खमितकरकर**
> **जिल्हा समाज कल्याण अधिकारी**

## बसस्थानक, भाजी मंडईत चोरट्यांचा सुळसुळाट

✔ **अक्कलकोट** : अक्कलकोट बसस्थानक व भाजी मंडईसह आठवडा बाजार, लग्नसराई, विविध मंदिर परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून गेल्या आठ दिवसात ५० मोबाईल, अनेक टु व्हिलर यासह सोने, चांदीचे दागिने, मोटारसायकली चोरण्याचा सपाटा लावला आहे.

गेल्या आठ दिवसात सुमारे १० लाखांहून अधिक भाविक, राज्य परिवहन महामंडळ बसेससह खाजगी वाहनातून श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी दाखल झालेले होते. अजूनही भक्तांची रिघ कायम आहे. याचाच फायदा चोरट्यांनी घेवून लाखो रुपयांचा ऐवज चोरीला गेला आहे. उन्हाळ्याची सुट्टी यासह शासकिय सुट्या यामुळे श्रीक्षेत्र अक्कलकोटमध्ये गेल्या आठ ते दहा दिवसात लाखो भाविक दर्शनासाठी दाखल झाले होते. गर्दीच्या ठिकाणचा फायदा घेवून चोरट्यांनी सुलभरित्या हातसफाई केल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रचंड गर्दी पाहता बसस्थानक, मंदिर परिसर, भाजी मंडई, आठवडा बाजार, शहरातील मुख्य मार्गावर पोलिस व होमगार्डस यांचा बंदोबस्त आवश्यक असताना ते दिसून न आल्याने चोरट्यांनी धुमाकुळ घातल्याचे बोलले जात आहे.

पोलिस ठाण्यामध्ये पोलिस निरीक्षकासह, सहाय्यक पोलिस निरीक्षक, पोलिस उपनिरीक्षक, पोलिस हेडकॉन्स्टेबल, पोलिस शिपाई यामधूनच डी.बी., क्राई ब्रँच हे देखील पथक कार्यरत असते. मात्र चोरांचा सुळसुळाट ते थोपवू शकत नसल्याने स्वामी भक्तांतून नाराजी पसरली आहे. अशा चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.



## उत्तमराव जानकर यांच्याकडून लोखंडे कुटुंबियांचे सांत्वन

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील नागरी आघाडीचे प्रभाग क्रमांक तीनचे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य गणेश शंकर लोखंडे यांचे नुकतेच हृदय विकाराच्या झटक्याने तर याच प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते देवदत्त लोखंडे यांचेही अल्पशा आजाराने निधन झाले. या निधनाबददल राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उत्तमराव जानकर यांनी दोन्ही कुटुंबीयाचे त्यांच्या घरी जाऊन सांत्वन केले.यावेळी विकासदादा धाईंजे, माजी जि.प. सदस्य बाळासाहेब धांईजे, पिलीवचे माजी सरपंच संग्राम पाटील, नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, ग्रामपंचायत सदस्य जिवन गुरव, कल्याण जावळे, संतोष शेठ पडळकर, कुमार लोखंडे, सागर लोखंडे, तानाजी मदने, केशव लोखंडे यांच्या सह अनेक मान्यवर यावेळी उपस्थिती होते.



## अक्षय भालेराव हत्या प्रकरणी चौकशीची मागणी

✔ **मोहोळ** : नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली येथील अक्षय भालेराव हत्येची चौकशी करण्याची मागणी मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण या संघटनेच्या वतीने केली आहे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली या गावात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून गावातीलच जातीयवादी गावगुंडांनी अक्षय भालेराव यांची निर्घृण हत्या केली. त्यांच्या कुटूंबलाही मारहाण करण्यात आली. बौद्ध वस्तीवर दगडफेक करण्यात आली. या घटनेचा मानव अधिकार व भ्रष्टाचार निवारण या संघटनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेची सी .आय .डी मार्फत चौकशी करावी आणि भालेराव याच्या कुटूंबाला तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी व त्यास न्याय द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही या निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. या बाबतचे निवेदन राज्य उपाध्यक्ष कुमार ढवळे यांच्या मार्गदशनाखाली मोहोळचे तहसिलदार प्रशात बेडसे यांना देण्यात आले. या निवेदनावर प. महाराष्ट्र सचिव संजय आठवले, जिल्हा सचिव इंजि .शशीकांत ठोकळे जिल्हा संघटक ॲड प्रेमनाथ सोनवणे, मोहोळ तालुका अध्यक्ष आकाश कापुरे, यशोदा कांबळे, अमर गायकवाड, दशरथ रणदिवे, संजय लोंढे, शिवाजी आवारे आदी सह पदाधिकारी उपस्थित होते.

## चिखली हिवरे यावली वडाचीवाडी परिसरात वटपौर्णिमा उत्साहात

✔ **चिखली** : पती पत्नीचे नाते सात जन्म टिकावे यासाठी ज्येष्ठ पोर्णिमा अर्थात वटपौर्णिमेला चिखली, हिवरे,यावली,वडाचीवाडी परिसरातील सर्वच सुवासिनींनी वडाची पूजा करून पतीच्या दिर्घायुष्यासाठी साकडे घातले. परिसरात वडाच्या झाडांची पुजा करण्यासाठी आणि त्याला सुत बांधण्यासाठी महिलांनी गर्दी केली होती. आख्यायिकेनुसार, सत्यवान आणि सावित्री या दाम्पत्याच्या आयुष्यात आलेला एक दिवस म्हणून वटपौर्णिमा आधुनिक युगातही तितक्याच पारंपरिक पद्धतीने साजरी केली जात आहे. हिंदू धर्मातील सण,प्रथा, परंपरा या निसर्गाच्या संस्कृतीशी जोडल्या गेल्या आहेत. जन्मोजन्मी हाच पती मिळावा यासाठी वटपौर्णिमा विवाहित महिला वटवृक्षाच्या मुळाशी पाणी शिंपून आणि बुंध्याला सुताचे सात फेरे घालतात. ही परंपरा पिढ्यानपिढ्या चालत आलेली आहे. या परंपरेप्रमाणे वटवृक्ष असलेल्या ठिकाणी वटवृक्षाची पूजा करण्यासाठी महिला मोठ्या प्रमाणात गर्दी करतात . वडाच्या वृक्षांचे आयुष्य जास्त असते तसेच त्यांच्या पारंब्याचा विस्तारही खूप मोठा होतो. त्याचप्रमाणे नैसर्गिकता: दिर्घायुष्य लाभलेल्या वडाच्या वृक्षाप्रमाणे आपल्या पतीला आणि कुटूबींयांना आरोग्य संपन्न दीर्घायुष्य लाभावे हा त्या मागचा हेतू आहे. शनिवार दिनांक ३ रोजी सकाळपासूनच सुवासिनींमध्ये पूजेची लगबग सुरू होती.

## करकंब येथे ट्रकच्या धडकेने दुधाच्या टँकर मधील १ ठार; दुसरा जखमी

✔ **सोलापूर** : पंढरपूर ते टेंभुर्णी मार्गावरील करकंब जवळ वेगाने जाणारा ट्रक दुधाच्या टँकरला समोरून धडकल्याने टँकर मधील एक जण ठार तर दुसरा जखमी झाला . हा अपघात सोमवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास घडला. शंकर मारुती बुरंगे (वय४४ रा.जवळा ता. सांगोला) असे मयताचे नाव आहे. ते दादासाहेब हाके (रा.जवळा) यांच्यासोबत दुधाच्या टँकर घेऊन पंढरपूर ते टेंभुर्णी च्या दिशेने निघाले होते. करकंब येथील शेटे वस्ती जवळ चुकिच्या दिशेने येणारा एमएच १६-सीसी- ८१११या क्रमांकाचा ट्रक समोरून धडकल्याने हा अपघात घडला. या अपघाताची नोंद करकंब पोलिसात झाली. अपघातानंतर पसार झालेल्या ट्रक चालकाविरुद्ध पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## सोलापूर संघाचा उस्मानाबाद संघावर दणदणीत विजय

✔ **सोलापूर** : राज्य क्रिकेट स्पर्धेत आर्या उमाप चे शानदार शतकमुळे सोलापूरने उस्मानाबाद संघावर दणदणीत विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी निर्णय योग्य ठरवीत सोलापूरने ३५ षटकात १ बाद २१५ धावा केल्या. आर्या उमप हिने नाबाद १२८, गौरी पाटील हिने नाबाद ४५ धावा केल्या. प्रतिउत्तर देत उस्मानाबाद संघ ९ बाद १३२ धावा केल्या. सोलापूर कादून विभावरी देवकाते, संचित सपाटे,गौरी पारडे ह्यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.सोलापूर संघाने ८३ धावांनी विजय मिळवला.. विजयी संघास सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटना चे सचिव श्री. चंद्रकांत रेंबोरसू ह्यांनी अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर Classified
नोकरी विषयक
Ex. Service Man at
**Valsang Toll Plaza**
(Neeraj kumar)
interested Candidate
Contact at Toll Plaza.
Mob No. : 9028919046
(120623)



## तांदुळवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

✔ सुराज्य/वेळापूर

तांदुळवाडी ग्रामपंचायतच्यावतीने शिवराज्याभिषेक सोहळा व स्वराज्याची गुढी उभारली आली. तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून दहावी व बारावी मधील यशस्वी विद्यार्थी विद्यार्थिनी यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर ग्रामपंचायत कडून तीन टक्के अपंग निधीचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. राहुल मिले तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा उद्योग केंद्र सोलापूर प्रतिनिधी अमृता पालवे तसेच अकलूज नगरपरिषद अधिकारी अभिलाषा निंबाळकर व युवा उद्योजक रोहित जाधव हे उपस्थित होते.

त्यानंतर माध्यमिक विद्यालय तांदुळवाडी व हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तांदुळवाडी मधील दहावी व बारावी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर ग्रामपंचायत तांदुळवाडी यांचे कडून निवडलेले अपंग लाभार्थी यांना तीन टक्के अपंग निधी वितरित करण्यात आला.

अमृता पालवे यांनी जिल्हा लघु उद्योग केंद्राकडून सुरू असलेल्या शासनाच्या विविध उपक्रमाबाबत व गावातील तरुणांसाठी व महिलांसाठी विविध रोजगाराच्या संधी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच अभिलाषा निंबाळकर यांनी स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन केले.

युवा उद्योजक रोहित जाधव यांनी भविष्यात नोकरी पेक्षा व्यवसायामध्ये कशी संधी उपलब्ध आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. राहुल मिले यांनी अध्यक्षीय भाषणात यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमासाठी दोन्ही हायस्कूलचे मुख्याध्यापक देवकर व दुधात तसेच तांदुळवाडी ग्रामपंचायत सरपंच भामाबाई जाधव, उपसरपंच विकास चव्हाण, तांदुळवाडी गावचे मार्गदर्शक व माजी जिल्हा नियोजन समिती सदस्य ॲड. नागेश काकडे, ग्रामपंचायत सदस्य शशिकांत कदम, सतीश कदम विकास सोसायटी संचालक, मेजर गोरख सुर्वे, ग्रामपंचायत सदस्य आकाश कदम, अनिल लोखंडे, किसनराव शिंदे, सोपान पारसे उपस्थित होते.

## सांगोल्यात थंड पाणी विक्री केंद्रावर गर्दी

✔ सुराज्य/सांगोला

सांगोला तालुक्यात कायम दुष्काळी परिस्थिती असल्याने ऐन उन्हाळ्यात तापमान कायम उच्चांकी राहते. सध्या वातावरणामध्ये तापमानाची मोठी नोंद झाली असल्याने नागरिकांची थंड पाण्याची मागणी वाढली असल्याने थंड पाणी विक्री करणाऱ्यांचा यामुळे व्यवसाय वाढला आहे. अनेक पाणी विक्री केंद्रावर गर्दी होत आहे. शहरात ठीक ठिकाणी पाणी विक्रीचे युनिट आहे. त्यांच्याकडे पाणी शुद्ध करण्याची स्वतंत्र यंत्रणा आहे. सध्या लग्नाचा हंगाम आहे. सांगोला शहरात प्रत्येक व्यापाऱ्याकडे व घरपोच पिण्याचे जार पोहोच करतात

त्याचबरोबर इतर कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या प्रमाणात होत असते. याठिकाणी थंड पाण्याचे जार जागेवर पोहच करण्याची सोय व्यवसायिक देत आहेत. साधे पाणी दहा रुपये तर थंड पाणी २० ते ३० रुपये जार मिळत आहे. काही ठिकाणी वॉटर एटीएम च्या माध्यमातून एक रुपयाचे, पाच व दहा रुपयाची नाण टाकून नागरिक पिण्यासाठी पाणी विकत घेत आहेत.

सांगोला शहरात सध्या एकदिवसातून पाणी पुरवठा होत असल तरी, अस्वच्छ व गढूळ पाणी येत असल्याने सांगोला शहरांमध्ये काही भागांमध्ये गटारी युक्त घाण पाणी नळाला येत असल्याने अनेक नागरिक हे पिण्याच्या पाण्याचे जार घरपोच मागवीत आहेत. सध्या अनेक व्यवसायिक हे ग्राहकांना थंड पाणी मिळावे म्हणून, थंड पाण्याचे जार व्यवसायाच्या ठिकाणी ठेवलेले असतात.

सध्या सर्वच कार्यक्रम घरगुती व व्यवसायाच्या ठिकाणी पाण्याच्या जार ची मागणी वाढली आहे पाणी विक्री यातून ही व्यवसाय होत असल्याने व दिवसेंदिवस थंड पाण्याची मागणी होत असल्याने पाणी विक्रीचा व्यवसाय मात्र सांगोला शहरात तेजीत चालला आहे

## भैरवनाथ शुगर येथे वृक्षारोपण कार्यक्रम

✔ **मंगळवेढा** : ५ जुन जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन व्हा.चेअरमन अनिल सावंत यांचे संकल्पनेतून कारखानास्थळी विविध देशी फळझाडांचे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.तसेच यावर्षी ५० व्या जागतिक पर्यावरण दिनाची संयुक्त राष्ट्रसंघाने राबविल्याप्रमाणे एकल प्लास्टीक वापर टाळा. सिंगल युज प्लॅस्टिक बॅनर याविषयी कारखान्यातील सर्व कामगारांना याबाबत महाराष्ट्र प्रदूषण मंडळ यांनी जारी केलेल्या मार्गदर्शन पत्रिकेचे वाचन करून त्याबद्दल माहिती देण्यात आली. व प्लॅस्टिक वापर टाळण्यासंबंधी प्रतिज्ञा करण्यात आली.

कार्यक्रमावेळी व्हा. चेअरमन अनिल सावंत साहेब, प्र. जनरल मॅनेजर बाळासाहेब शिंदे साहेब, वर्क्स मॅनेजर नानासाहेब पोकळे मुख्य शेती अधिकारी शिवाजी चव्हाण व शेती अधिकारी कृष्णदेव लोंढे चीफ अकाऊंटंट पासले साहेब या सर्व मान्यवरांचे हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उर्वरित सर्व झाडे कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांचे हस्ते लावण्यात आली. तसेच भैरवनाथ शुगरचे मुख्य शेती अधिकारी शिवाजीराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांच्या हस्ते विविध ५ झाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली.



## अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त पिलीव येथे मिरवणूक

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त जयंती उत्सव समीतीच्या वतीने भव्य अशी रथातुन अहील्यादेवी होळकर यांची मिरवणूक काढण्यात आली.

प्रतिमेचे पुजन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते उत्तमराव जानकर, जयंती समीतीचे अध्यक्ष सचिन मदने, शयामतात्या मदने, नितीन कपने,लहु पाटील, छगन मदने सर,माजी सरपंच अमोल मदने,छगन मदने सर,आनंद् पाटील,राहुल मदने,मोहन मदने, राहुल जावळे,शिवराज पुकळे, जितेंद्र पाटील, प्रकाश पाटील, सागर शेंडगे,प्रवीण जावळे,सर्जे राव मदने,अरुण मदने,जयंती समीतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उदघाटन करणयात आले. यानंतर ही मिरवणूक धोंडो आबाजी पुतळयापासुन ,आंधळकर चौक,महावीर मेडीकल चौक, महाराणा प्रताप चौक, जि प शाळेपासुन ,अहील्यादेवी चौकात अहील्यादेवी होळकर यांच्या पुतळयास पुष्पहार घालुन मिरवणुकीचा सांगता करणयात आली या मिरवणुकीमधये पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, सुळेवाडी, बचेरी ,काळमवाडी, चांदापुरी येथील युवक व समाजबांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

मिरवणूक शांततेत पार पाडणयासाठी पिलीव पोलीस ठाणयाचे सहहयाक पोलीस निरीक्षक पुजारी, हवालदार पंडीत मिसाळ, सतीश धुमाळ, अभिजीत कणसे, दत्ता खरात, अमीत जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## बैलगाडी शर्यतीत बैलाच्या धक्क्याने जखमी झालेल्या वृद्धाचा मृत्यू



✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथील कारहुणवी सणानिमित्त शनिवारी सायंकाळी काढण्यात आलेल्या बैलगाडी शर्यतीच्या वेळी एका बैलाने दुसऱ्या बैलगाडीला जोरदार धक्का दिल्याने बैलगाडी उलटून जखमी झालेले वागदरी गावातील साहेबलाल मुल्ला (वय वर्षे ६५) यांचा मृत्यू झाला आहे.

ही घटना शनिवारी सायंकाळी पाच च्या सुमारास घडली होती. सिव्हील हॉस्पिटलने त्या वृध्द जखमी व्यक्तीला उपचाराविना दोन तास तात्काळत ठेवले होते.त्यामुळे त्या वृद्धाची प्रकृती अधिकच खालावली होती. शेवटी आज त्या वृध्द साहेबलाल मुल्ला यांचा मृत्यू झाल्याने वागदरी बैलगाडा शर्यत आयोजकांना मोठा धक्का बसला आहे.सिव्हील हॉस्पिटल येथे ऑक्सिजन बेड नसल्याचे कारण सांगत जखमी साहेबलाल मुल्ला याला दोन तास तात्काळत ठेवले होते.शेवटी नातेवाईकांनी साहेबलाल मुल्ला यांना खासगी दवाखान्यात दाखल केले होते.

खासगी दवाखान्यातून परत साहेबलाल मुल्ला यांना सिव्हिल हॉस्पिटल मध्ये आणण्यात आले होते.आज पहाटे ३.३० वाजता साहेबलाल मुल्ला यांचा मृत्यू झाल्याने वागदरी गावात व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# महसूल विभागातील दलाल प्रवृत्तीला बसणार आळा

## मोहोळ तालुक्यात 'फिफो' प्रणाली लागू

✔ सुराज्य/चिखली

**शासनाच्या विविध प्रमाणपत्रासाठी (गव्हरमेंट सर्टिफिकेट) दलालांमार्फत शोधला जातो. मग ते जात प्रमाणपत्र असो अथवा उत्पन्नाचा दाखला, दलाल प्रवृत्तीमुळे रांगेत असणाऱ्यांची कामे होत नाहीत. मात्र जे पैसे देऊन दलालामार्फत पोहचतात त्यांची कामे आधी होतात असाच अनुभव आहे. पण या शॉर्टकट साधणाऱ्या दलाल प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी मोहोळ तालुक्यात २८ मे पासून 'फर्स्ट इन फर्स्ट आउट' म्हणजेच फिफो प्रणाली वापरण्याचा निर्णय महाआयटीकडून घेण्यात आला आहे.**

मोहोळ तालुक्यात निर्णयाची अंमलबजावणी देखील सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे आता प्रमाणपत्र मिळणे सोयीचे होणार आहेच परंतु सामान्य नागरिकांची दलाल प्रवृत्तीमधून सुटका होण्याची अपेक्षा देखील वर्तवण्यात आली आहे. या प्रणालीच्या माध्यमातून प्रथम अर्ज करण्यात आलेल्या व्यक्तींचे काम आधी करण्यात येणार आहे. संपूर्ण राज्यात ही प्रणाली लागू करण्यात आली असून मोहोळ मध्ये देखील त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. आपले सरकार या संकेतस्थळावर अथवा ऑनलाइन सरकारी केंद्रावरून प्रमाणपत्रासाठी अर्ज केला जातो. विविध डेस्कच्या माध्यमातून हे अर्ज निकाली काढण्यात येतात. याआधी अर्ज केल्यावर प्रमाणपत्र मिळण्यासाठी विलंब होत होता. आधी अर्ज केला असताना देखील मधल्याच माणसाला प्राधान्य मिळायचे. दलाल प्रवृत्तीमुळे नंतर केलेला अर्ज देखील निकाली लागत होता. दलाला मार्फतच काम लवकर होते, अशी समज नागरिकांची झाली होती.

याला कुठे तरी आळा बसला पाहिजे यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येत होते. त्यामुळे आता 'फर्स्ट इन फर्स्ट आउट' या प्रणालीमुळे या प्रकाराला आळा बसणार असल्याचं शासन अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

फिफो प्रणालीनुसार तारिख आणि वेळेनुसार प्रथम येणारा अर्ज स्वीकारला किंवा नाकारला जाणार आहे. क्लार्क, अव्वल कारकून अथवा नायब तहसिलदार आणि तहसिलदार अथवा उपजिल्हाधिकारी अशा तीन टप्प्यामधून प्रमाणपत्राचे अर्ज पुढे जात असतात. फिफो प्रणालीमुळे कुणालाही अतिरिक्त पैसे देण्याची गरज पडणार नाही. आधी आलेल्या अर्जावर आधी विचार आता करण्यात येणार आहे. फिफो प्रणालीमुळे प्रमाणपत्र मिळण्याची पद्धत तांत्रिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे चित्र आहे. रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर, जेष्ठ नागरिक, अल्पभूधारक अशा विविध प्रमाणपत्रासाठी कालावधी ठरवून देण्यात आला आहे. यासाठी आकारण्यात येणारे शुल्क देखील ठरवून देण्यात आले आहे. फिफो प्रणालीच्या अंमलबजावणीला सुरुवात करण्यात आली. त्यामुळे नागरिकांना प्रमाणपत्र मिळणे आता सुलभ झाले आहे. आधी अर्ज करणाऱ्यांना आधी प्राधान्य दिले जाणार आहे. aaplesarkar.mahaonline.gov.in यावर ही प्रणाली उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी देखील दलाल प्रवृत्तीला बळी न पडता याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाआयटी विभागाने केले आहे.

# रायगडावरील शिवसृष्टीसाठी ५० कोटी देणार : मुख्यमंत्री

✔ सुराज्य/पुणे

रायगडावर मोठ्या उत्साहात शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा केला जात आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील जनतेला संबोधित केलं. तेव्हा त्यांनी रायगडावरील शिवसृष्टीसाठी ५० कोटी रुपये देण्याची घोषणा केली तसेच प्रतापगडाच्या संवर्धनासाठी प्रतापगड प्राधिकरण करण्याचे घोषणाही केली.



रायगड किल्ल्यावर प्रत्यक्ष उभारण्यासाठी शिवसृष्टी निर्माण करण्यात येणार आहे. याकरता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ५० कोटींच्या निधीची तरतूद केली असल्याची आज घोषणा करण्यात आली. तसंच, प्रतापगडच्या संवधर्नाकरता प्रतापगड प्राधिकारण करण्यात येणार आहे. या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी उदयनराजे भोसले असतील, अशीही घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. तसंच, लंडनच्या संग्रहालयात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची भवानी तलवार आणि वाघनखे महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ही त्यांनी पुढे स्पष्ट केले. याकरता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सुधीर मुनगंटीवार प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले.

स्वराज्याची स्थापना करण्याचं ध्येय घेऊन वयाच्या १६व्या वर्षी शपथ घेणाऱ्या शिवरायांचे बरोबर ३५० वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी 'छत्रपती' शिवाजी महाराज झाले! रायगडावर मोठ्या दिमाखात शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा पार पडला होता. त्या घटनेला तिथीनुसार आज ३५० वर्षं पूर्ण झाली. यानिमित्ताने रायगडावर मोठ्या उत्साहात शिवराज्याभिषेक दिन सोहळा साजरा केला जात आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्रातील जनतेला संबोधित केलं. तेव्हा त्यांनी दोन मोठ्या घोषणा केल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा इतिहास

आजचा सोहळा म्हणजे छत्रपती शिवरायांच्या चरणी अर्पण केलेली पूजा आहे. आमच्या पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत हे सरकार सर्वसामान्यांचं सरकार आहे, न्याय देणारं आहे, रयतेच्या हक्काचं रक्षण करणारं आहे अशा प्रकारची सुरुवात छत्रपती शिवरायांच्या प्रेरणेने केली, असं शिंदे म्हणाले.

## भवानी तलवार आणणार

लंडनच्या संग्रहालयात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची भवानी तलवार आणि वाघनखे महाराष्ट्रात आणण्यासाठी सरकार प्रयत्न करतंय. मोदी साहेब आपल्याला मदत करतील आणि आपलं स्वप्न पूर्ण झाल्याशिवाय राहणार आहे, असं आश्वासनही शिंदे यांनी दिलं.

## शिवमय वातावरणात शिवराज्याभिषेक दिन साजरा





छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेकदिनानिमित्त रायगडावर युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवपुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला तर दुसऱ्या छायाचित्रात रायगडावर जमलेले शिवभक्त.

# अरबी समुद्रात 'बिपरजॉय' चक्रीवादळ

## मुंबईसह कोकण किनारपट्टीला धोका

✔ सुराज्य/मुंबई

भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, अरबी समुद्रात बिपरजॉय चक्रीवादळ तयार होत असून याचा परिणाम केरळात धडकणाऱ्या मान्सूनवर होणार आहे. परिणामी कोकणाच्या दिशेने सरकत येणारा मान्सूनही उशिरा होणार आहे. खोल अरबी समुद्रात चक्रावादळाची स्थिती निर्माण झाली आहे. मुंबईपासून ११२० किलोमीटर अंतरावर हे वादळ आहे.

मुंबईसह कोकण किनारपट्टीला हवामान खात्याने अर्लट दिला आहे. चक्रीवादळ खोल समुद्रात असल्याने किनारपट्टीवर पावसाची शक्यता नाही. पण मच्छिमारांनी खोल समुद्रात जाऊ नये, असे आवाहन हवामान खात्याने केले आहे. चक्रीवादळाला बांगलादेशने 'बिपरजॉय' असं नाव दिलं आहे.

उन्हाच्या काहिलीपासून सुटका मिळण्याकरता पावसाची वाट पाहणाऱ्या नागरिकांना आता आणखी प्रतिक्षा करावी लागणार आहे. कारण खोल अरबी समुद्रात तयार होणाऱ्या चक्रीवादळामुळे पाऊस लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार अरबी समुद्रात बिपरजॉय चक्रीवादळ तयार होत असून याचा परिणाम केरळात धडकणाऱ्या मान्सूनवर होणार आहे.

या चक्रीवादळाचा वेग ११ किलोमीटर प्रतितास आहे. चक्रीवादळ उत्तरेच्या दिशेने सरकत आहे. हे चक्रीवदाळ पुढे सरकत असलं तरी हळूहळू त्याची तीव्रता





वाढत जाणार आहे. पूर्वमध्य अरबी समुद्रात आणि दक्षिण-पूर्व अरबी समुद्रात सध्या ही स्थिती निर्माण झाली आहे, अशी माहिती पुणे हवामान विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसळीकर यांनी ट्विट करून दिली आहे.

दक्षिण पूर्व अरबी समुद्रात तयार झालेली चक्रीवादळाची स्थिती पुढील २४ तासात अधिक तीव्र होऊन त्याचे कमी दाबाच्या पट्ट्यात रुपांतर होईल.

या पट्ट्याची तीव्रता कमी झाल्यानंतर मान्सूनसाठी पोषक वातावरण तयार होईल. त्यामुळे केरळमध्ये मान्सून या आठवड्याच्या अखेरीस दाखल होईल व त्यानंतर पुढील आठवड्यात महाराष्ट्रात दाखल होईल.

१६ ते २२ जून २०२३ या कालावधीत मान्सून संपूर्ण महाराष्ट्र व्यापण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

### बिपरजॉय चक्रीवादळ कसे तयार होणार?

चक्रीवादळाच्या सध्याच्या गतीनुसार हे वादळ पाकिस्तानच्या दिशेने घोंघावत जात आहे. त्यामुळे भारतीय समुद्र किनाऱ्यांना या वादळाचा धोका नसल्याचं हवामान खात्याने स्पष्ट केलं आहे. हे वादळ उत्तरेकडे सरकण्याची शक्यता आहे. तर, पूर्व-मध्य अरबी समुद्र आणि लगतच्या आग्नेय अरबी समुद्रावर पुढील २४ तासांत चक्रीवादळ तीव्र होण्याची शक्यता आहे. वादळ तीव्र झाल्यानंतर, हे वादळ बिपरजॉय चक्रीवादळ म्हणून ओळखले जाईल.

## महत्त्वाचे वृत्त

### ठेकेदाराचे रुग्णालयांना धो-धो धुतले

✔ **नाशिक** : रुग्णालयांमध्ये मर्यादित खाटा असतानाही ठेकेदाराने मात्र अव्वाच्या सव्वा बिले लाटल्याचे धक्कादायक प्रकरण ट्रेझरी ऑडिटमध्ये उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे रुग्णालयांच्या आर्थिक धुलाईचा हा उद्योग २०१४ पासून सुरू असतानाही, सिव्हिल प्रशासन मात्र डोळे बंद करुन बिले मंजूर करत होता. धक्कादायक बाब म्हणजे, मार्च २०२३ मध्ये भ्रष्टाचाराचा हा प्रकार समजल्यानंतर सिव्हिलने सुरू केलेली चौकशी तीन महिने उलटूनही पूर्ण झालेली नाही. त्यामुळे सिव्हिल प्रशासनदेखील संशयाच्या भोवर्यात सापडले आहे. जिल्ह्यातील ३२ ग्रामीण रुग्णालयांमधील बेडशीट, उशींचे कव्हर, पांघरण्याच्या चादरी आदी तत्सम बाबी धुवत त्याची इस्त्री करून देण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदारावर देण्यात आली आहे. मात्र, ठेकेदार त्यात भ्रष्टाचार करत असल्याचे ट्रेझरी ऑडिटमधून समोर आले आहे.

### बोगस कर्जप्रकरणाद्वारे कोट्यवधींची माया

✔ **नाशिक** : जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वणी कार्यकारी सोसायटीत झालेल्या १ कोटी रुपयांच्या अपहारप्रकरणी अनेक धक्कादायक खुलासे बाहेर येत असून, याप्रकरणातील संशयित गटसचिव दत्तात्रय कोरडे यांनी काही खातेदारांची बोगस कर्ज प्रकरणे बनवूनन कर्जाची रक्कम परस्पर हडप केली आहे. अशापद्धतीने कोरडे यांनी कोट्यवधी रुपयांची माया जमवली असून, याची व्याप्ती केवळ १ कोटींपर्यंत मर्यादित नसून, अनेक प्रकरणे समोर येण्याची शक्यता आहे. वणी विविध कार्यकारी सोसायटीत १ कोटी रुपयांचा अपहार झाला. याप्रकरणाला आपलं महानगरने वाचा फोडल्यानंतर याबाबत अनेक धक्कादायक माहिती उजेडात आली आहे.

### रेल्वे अपघाताची चौकशी व्हावी : पवार

✔ **पुणे** : ओडिशा रेल्वे अपघातानंतर देशभरात एकच खळबळ उडाली आहे. या अपघातात आतापर्यंत २६१ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ९०० हून अधिक जण गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान, या रेल्वे अपघाताची चौकशी व्हावी. कारण सत्यता समोर येईल, असं राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार म्हणाले. शरद पवार यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, 'या रेल्वे अपघाताची चौकशी व्हावी, अशा प्रकारची मागणी सर्वांकडून केली जात आहे. त्यामधून सत्यता समोर येईलच. त्यानंतर पुढील काही गोष्टी सुचवता येतील, असं शरद पवार म्हणाले.'

### जास्त जागा आल्यास दादाच मुख्यमंत्री : भुजबळ

✔ **नाशिक** : मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून भावी मुख्यमंत्र्यांचे बॅनर्स आणि पोस्टर्स लावले जात आहेत. सध्या लोकसभेच्या निवडणुकीकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार हे मुख्यमंत्री होतील, अशी आमदार नरहरी झिरवाळ यांची सदिच्छा आहे. मात्र, त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जास्तीत जास्त मेहनत घ्यावी लागेल. कारण अजित पवार यांच्याकडे विरोधी पक्षनेतेपद आहे. जर महाविकास आघाडीच्या जास्त जागा निवडून आल्या तर अजित पवार हे मुख्यमंत्री होऊ शकतात, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी व्यक्त केला आहे.

### विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर

✔ **मुंबई** : देशातील थेट विदेशी गुंतवणुकीत महाराष्ट्राने आघाडी घेतल्याचे स्पष्ट झाले आहे. गेल्या साडेतीन वर्षांत राज्यात सुमारे चार लाख कोटींची विदेशी गुंतवणूक आली असून देशभरातील एकूण गुंतवणुकीत महाराष्ट्राचा वाटा २९ टक्के आहे. यापैकी २०२२-२३ या आर्थिक वर्षांत १ लाख १८ हजार कोटींची गुंतवणूक आली असून देशात राज्याचा पहिला क्रमांक लागला आहे. केंद्र सरकारच्या उद्योग विभागातर्फे राज्यांतर्गत विदेशी गुंतवणुकीची आकडेवारी नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये २०२२-२३ या वर्षांत महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक गुंतवणूक आल्याचे स्पष्ट झाले.

# अल्पसंख्याकांसाठी चिंतेचे वातावरण : पवार

✔ सुराज्य/मुंबई

अल्पसंख्याक विशेषतः ख्रिचन आणि मुस्लिमांना चिंता वाटावी असं वातावरण देशात आहे. मात्र हिंसा करणाऱ्यांना जनतेने नाकारलं आहे, असे वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मंगळवारी केले.

ख्रिचन हे शांत आहेत. त्यांचा स्वभाव अतिरेकी नाही. तरीही चर्चवर हल्ले होत आहेत. कोण आहेत हे हल्ले करणारे. काही मुस्लीम हिंसक आहेत. तसे हिंसक हिंदूंमध्येही आहेत. त्यामुळे सर्वांना एका रांगेत उभे करता येणार नाही.



मुस्लीम समाजाची प्रगतीच झालेली नाही. ते शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेले आहेत याचाही विचार व्हायला हवा. देशाची प्रगती होत असताना प्रत्येक समाजाचा विचार झालाच पाहिजे, असे शरद पवार यांनी सांगितले.

शरद पवार म्हणाले, बहुतांश राज्यांनी भाजपला नाकारलं आहे. महाराष्ट्राचा विषय आपण बाजूला ठेवू. पण गोव्यात काँग्रेसचे सरकार होते. जनतेने तसा कौल दिला होता. फोडाफोडीचं राजकारण करून भाजपने तेथे सत्ता आणली. अनेक राज्यांमध्ये भाजपने फोडाफोडी करून सत्ता आणली. पण कर्नाटकच्या जनतेने भाजपला नाकारलं. कर्नाटक विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा झाल्या. भव्य अशा रॅली निघाल्या. मी स्वतः प्रचार बघितला. तरीही जनतेने हिंसा करणाऱ्यांना नाकारलं आहे. इन्स्टिट्यूशनवर हल्ला करणारे जनतेला नाकोत, असेही शरद पवार यांनी सांगितलं.

# राज्यभरातील ८८ गृहनिर्माण प्रकल्पांची नोंदणी होणार रद्द

✔ सुराज्य/मुंबई

विविध कारणांमुळे कधीही पूर्ण न होऊ शकणाऱ्या आणि अव्यवहार्य अशा राज्यातील ८८ गृहप्रकल्पांची महारेरा नोंदणी आता रद्द होणार आहे. या प्रकल्पांची यादी महारेराने आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. तसेच या प्रकल्पांविषयी कोणाचेही काही आक्षेप असल्यास १५ दिवसात ते नोंदविण्याचे आवाहन महारेराने केले आहे.

नवीन गृहप्रकल्पांना महारेरा नोंदणी बंधनकारक आहे. विहित मुदतीत प्रकल्प पूर्ण करणेही विकासकांसाठी बंधनकारक आहे. जे विकासक वेळेत प्रकल्प पूर्ण करत नाहीत किंवा नोंदणीची मुदत संपते त्या प्रकल्पांची नोंदणी रद्द केली जाते. अशी तरतूद रेरा कायद्यात आहे.

महारेराने १० फेब्रुवारी २०२३ रोजी एका परिपत्रकाद्वारे अव्यहार्य आणि कधी ही पूर्ण होऊ न शकणाऱ्या प्रकल्पाची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयाची अंमलबजावणी आता सुरु झाली असून त्यानुसार राज्यातील ८८ प्रकल्पांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय महारेराने घेतला आहे. शून्य नोंदणी, निधीची उपलब्धता नसणे, प्रकल्प आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य असणे, न्यायालयीन खटले, कौटुंबिक वाद, नियोजनाबाबत शासकीय नवीन अधिसूचना या आणि अशा काही कारणांमुळे पूर्ण होऊ न शकणाऱ्या प्रकल्पांचा यात समावेश आहे.

# गर्भवती माता व बालकांसाठी 'किलबिलाट ॲम्ब्युलन्स'

✔ सुराज्य/मुंबई

गर्भवती माता आणि बालक यांच्यासाठी आल्हाददायक वातावरण असलेली 'किलबिलाट ॲम्ब्युलन्स' हा नाविन्यपूर्ण उपक्रम आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सह्याद्री अतिथीगृह येथे 'किलबिलाट ॲम्ब्युलन्स'च्या उद्‌घाटनानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी महिला व बालविकासमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. एकबाल सिंह चहल यासह मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या ॲम्बुलन्सच्या माध्यमातून गर्भवती माता आणि बालकांना चांगली सुविधा मिळणार असून, ज्या बालकांना कोणी पालक नाही, अशा बालकांचे पुनर्वसन करणे त्यांना योग्य उपचार मिळवून देणे, ही सेवा प्राधान्याने दिली जाणार आहे. या उपक्रमासाठी महिला व बालविकास विभाग, जिल्हा नियोजन आणि मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला जात आहे. महिला व बालविकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांचे मी अभिनंदन करतो आणि या उपक्रमाला शुभेच्छा देतो, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# चव्हाणांच्या बालेकिल्ल्यात शहांची तोफ धडधडणार

✔ सुराज्य/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी राज्यातील सर्वच पक्षांकडून मोर्चेबांधणीला सुरूवात झाली आहे. या निवडणुकीसाठी भाजपने कंबर कसली असून भाजपचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे थेट मैदानात उतरले आहेत. नांदेडमध्ये येत्या १० जूनला अमित शाह यांची जाहीर सभा होणार आहे. माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक चव्हाण यांच्या बालेकिल्ल्यात शाहांची तोफ धडाडणार असून भाजपने रणनिती आखण्यास सुरूवात केली आहे.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या सरकारला ३० मे रोजी ९ वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने १ जून ते ३० जूनच्या दरम्यान देशातील प्रत्येक लोकसभा मतदारसंघात मोदी ९ विशेष जनसंपर्क अभियान राबविण्यात येत आहे. त्याच पार्श्वभूमीवर अमित शाह १० जूनला नांदेडमध्ये येणार असून सायंकाळी ५ वाजता अबचलनगर, बाफना येथे जाहीर सभा होणार आहे.

नांदेड हा अशोक चव्हाण यांचा गड मानला जातो. नांदेड जिल्ह्यात काँग्रेसची मोठी ताकद आहे. मविआ एकत्र लढल्यास भाजपच्या अडचणी वाढू शकतात. नांदेडमध्ये शक्ती प्रदर्शन करून अशोक चव्हाणांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अबचलनगर भागातील खुल्या मैदानात ही सभा होणार असून, त्यासाठी भाजपकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. या सभेला पन्नास हजारांहून अधिकचे लोक उपस्थित राहतील, असा दावा नांदेडचे खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केला आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्यांचा रेट किती?

## लाच घेण्याचे रेटकार्ड सांगत अजित पवारांचे गंभीर आरोप

✔ सुराज्य/मुंबई

राज्याचे विरोधी पक्षनेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अजित पवार यांनी शिंदे-फडणवीस सरकारवर जिल्हाधिकारी, कृषी सहाय्यक अशा सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी लाच घेतल्याचा गंभीर आरोप केला आहे. यावेळी त्यांनी बदलीचे अधिकार ठराविक आमदारांनाच असल्याचं सांगत बदलीच्या रेटकार्डचे आकडेही सांगितले.

अजित पवार म्हणाले, 'माझे अनेक आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांशी चांगले संबंध आहेत. ते सांगतात की, आमचा उल्लेख करू नका, पण आम्हाला अधिकार असले, तरी मंत्रालयातून आलेल्या यादीतील अधिकाऱ्यांचेच आदेश काढावेत, असे तोंडी आदेश आहेत. त्यातील काही तर अगदी परदेशातही गेले आहेत. बदल्या होणं, यांनी परदेशात जाणं आणि बातम्या येणं हा काही योगायोग आहे का हा संशोधनाचा मुद्दा आहे.

अजित पवार पुढे म्हणाले, 'कृषी सहाय्यक पदासाठीचा रेट ३ लाख रुपये आहे, असं प्रसारमाध्यमांमध्ये छापून आलं आहे. लाखो-कोट्यावधी रुपये देऊन आलेले अधिकारी प्रामाणिकपणे काम



कसं करू शकतील? शासन आपल्या दारी नेलं काय किंवा शासन आणखी कुठं नेलं तरी शासकिय अधिकाऱ्यांची मानसिकता बदलल्याशिवाय उपयोग नाही. शासन आपल्या दारी ही जनतेची फसवणूक आहे. अधिकाऱ्यांची मानसिकता बदलल्याशिवाय ही फसवणूक थांबणार नाही.'

जुन्नरचे आमचे आमदार अतुल बेनके येथे बसले आहेत, त्यांनाही विचारा. वेगवेगळ्या ठिकाणी अधिकारी मोठ्या प्रमाणात नाउमेद झाले आहेत. पत्रकारांनी अधिकाऱ्यांना खासगीत विचारावं. अनेक अधिकारी म्हणतात की, 'आम्हाला महत्त्वाची पोस्टिंग नकोच. आमच्याकडून नको ती कामं करून घेतात. राज्याच्या इतिहासात असं कधी घडलं नव्हतं, असंही अजित पवारांनी नमूद केलं.'

### ठराविक आमदारांनाच बदलीचे अधिकार

मागे माजी खासदार राजू शेट्टी यांनीही बदलीचं रेटकार्ड मुख्यमंत्री आणि राज्यपालांना पाठवलं होतं. त्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्यांचा रेट किती आहे, हे सांगितलं होतं. कुठल्या आमदारांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या बदल्या सांगितल्यावर बदल्या होणार हेही ठरलं आहे. हा अधिकार ठराविक आमदारांनाच दिला आहे. ते पण बदली करायची की नाही यावर चर्चा करतात, असं अजित पवारांनी म्हटलं.





# शहरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

## ■ शिवज्योत रॅली, व्याख्यान, अभिषेक करुन महाराजांना केले अभिवादन

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहरात विविध संस्था, संघटना, पक्षाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. विविध उपक्रम राबवून महाराजांना अभिवादन करण्यात आले. रंगभवन येथील महाराजांच्या पुतळ्यास मंत्रोपचाराच्या जयघोषात चारधाम व सप्तनद्यांच्या जलाशयाने अभिषेक करण्यात आला. संभाजी आरमारतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला तसेच शिवस्मारक शिवरायांच्या मूर्ती मंडपात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. आ.विजयकुमार देशमुख, नरेंद्र काळे आदींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस अभिषेक केला.**

### सोलापूर विद्यापीठ

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवचरित्र अभ्यासक प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांचे व्याख्यान पार पडले. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत हे होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू प्रा. डॉ. गौतम कांबळे, कुलसचिव योगिनी घारे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले. व्याख्यानापूर्वी मंगळवारी सकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिवज्योत रॅली निघाली. यामध्ये एनएसएसचे



विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजाभाऊ सरवदे, प्रा. सचिन गायकवाड यांच्यासह अधिकारी, शिक्षक, कर्मचारी सहभागी झाले होते.

### सोलापूर महापालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी चौक येथील श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल, आयुक्त कार्यालयात प्रतिमेस महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी विठ्ठल कस्तुरे, शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे अध्यक्ष पद्माकर काळे, खजिनदार अंबादास शेळके, सचिव प्रीतम परदेशी, कार्याध्यक्ष श्रीकांत घाडगे, उपाध्यक्ष श्रीकांत डांगे, ट्रस्टी सदस्य राजन भाऊ जाधव, भाऊ रोडगे, माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, सूर्यकांत पाटील, सदाशिव पवार, प्रकाश ननवरे,उत्सव अध्यक्ष मतीन भाई बागवान, उत्सव कार्याध्यक्ष मनीष काळजे,दीपक शेळके,चंद्रकांत पवार,सुनील शेळके, विजय पुकाळे, भास्कर सामलेटी आदी मान्यवर उपस्थित होते.

### जिल्हा परिषदेत स्वराज्याची गुढी

सोलापूर जिल्हा परिषदेत शिवाजीमहाराज उद्यानातील शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुतळा सभोवताली मांडव घालण्यात आला होता. भगव्या स्वराज्य ध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारून त्याचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, अतिरीक्त मुख्य कार्यकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादिन शेळकंदे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, कार्यकारी




अभियंता नरेंद्र खराडे, माध्यामिक शिक्षणाधिकारी जावेद शेख , प्रकल्प संचालक अमोल जाधव, कृषी अधिकारी परमेश्वर वाघमोडे, गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ, सोलापूर जिल्ह्याचे ब्रँड अँबेसिडर गायक मोहम्मद आयाज, मराठा सेवा संघ कर्मचारी संघटनेचे अविनाश गोडसे, कर्मचारी युनियनचे विवेक लिंगराज, सचिन जाधव यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### शहर काँग्रेस कमिटी

शहर काँग्रेसतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिना निमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, मा. नगरसेवक विनोद भोसले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महिला अध्यक्ष हेमाताई चिंचोलकर, तिरुपती परकीपंडला, अनिल मस्के, सुमन जाधव, लखन गायकवाड, संजय गायकवाड, विवेक कन्ना, राजेश झंपले, चंद्रकांत टिक्के, शाहु सलगर, जाधव, सचिन हाके, समर्थ तलिखेड़े, अभिलाष मुळे, सौरभ सालुंखे, शोभा बोबे, चंदाताई काळे, रुकैयाबानु बिराजदार यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

### मध्यवर्ती महामंडळ

मध्यवर्ती ट्रस्टी मंडळातर्फे शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनानिमित्त सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांच्या हस्ते पूजा करण्यात आला. यावेळी मध्यवर्ती ट्रस्टी मंडळाचे अध्यक्ष पद्माकर काळे , आयुक्त शितल उगले-तेली मॅडम, उत्सव अध्यक्ष मतीन भाई बागवान,ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व शिवभक्त उपस्थित होते.

# पुढे जाणाऱ्या लोकांवर सोलापूर भाजपकडून अन्याय

- सुरेश पाटील यांनी व्यक्त केली खदखद
- अप्रत्यक्षरित्या विजयकुमार देशमुख यांच्यावर टीका

सुराज्य/सोलापूर

भाजप हा पक्ष देशात आणि राज्यात चांगला आहे मात्र सोलापुरातील नेत्यांनी तो वाईट केला आहे. शहरात जो पुढे जातो त्याच्यावर काही लोकांकडून अन्याय होत आहे. बिज्जू प्रधाने, प्रा. अशोक निंबर्गी हे भाजपचे कट्टर कार्यकर्ते पक्ष सोडून का जात आहेत. याचा आता विचार करण्याची वेळ आली आहे. सोलापूर शहरातील नेत्यांनी आत्मचिंतन केले पाहिजे, अशी खदखद माजी पक्षनेते सुरेश पाटील यांनी व्यक्त केली.

यावेळी त्यांनी माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्यावर अप्रत्यक्षरीत्या टीकाच केली. मंगळवारी सुरेश पाटील यांनी तळे हिप्परगा रेस्ट हाऊस जवळ आपल्या भागातील समर्थक कार्यकर्त्यांची मोठी बैठक घेतली. माध्यमांशी बोलताना आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. नुकतेच भाजपचे माजी शहर अध्यक्ष अशोक निंबर्गी हे काँग्रेस पक्षात गेल्याने भाजपमधील अंतर्गत नाराजी चव्हाट्यावर आली. आता माजी सभागृह नेते सुरेश पाटील यांनी देखील तातडीची बैठक बोलावून पक्षात सुरू असलेल्या घुसमटीला वाचा फोडली.

२५-३० वर्षे महापालिकेवर काँग्रेसची सत्ता होती. गत निवडणुकीत भाजपची सत्ता आली आणि काही लोकांना मंत्रिपद मिळाले. मंत्रिपद मिळाल्यानंतर त्यांनी मनमानी कारभार सुरू



केला. जुन्या लोकांवर अन्याय केला. त्यामुळेच प्रधाने, प्रा. अशोक निंबर्गी यांनी पक्ष सोडला मात्र त्यांना थांबवण्यासाठी येथील नेत्यांनी प्रयत्न केले नाही.

भाजपचे कट्टर कार्यकर्ते पक्ष सोडून का जात आहेत याचे आत्मचिंतन करण्याची वेळ शहरातील नेत्यांवर आल्याचे सुरेश पाटील म्हणाले.

माजी सभागृह नेते सुरेश पाटील भाजपचे जुने निष्ठावंत कार्यकर्ते असून गेले २५ वर्ष भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक, स्थायी समिती सभापती, विरोधी पक्षनेते अशी महत्वाच्या पदावर काम केल्याने एक मोठा जनसमुदाय त्यांच्या पाठीशी आहे. २०१४ साली विधानसभेला शहर उत्तर मतदारसंघात पाटलांनी भाजपकडे उमेदवारी मागितली होती.

### त्या लोकांची दिलगिरी व्यक्त केली व्यक्त

माझ्यावर मध्यंतरी विषप्रयोग झाला होता. त्यावेळी मी ज्या लोकांची नावे घेतली होती ती चुकीने घेतली होती. आजही मी त्यांची माफी मागत आहे, दिलगिरी व्यक्त करतो. मात्र त्यावेळी सीसीटीव्ही फुटेज आणि मी लिहून ठेवलेले कागदपत्रे अजूनही माझ्याकडे आहेत. कोणी सांगितले कोणी केले याचे पुरावे ही आहेत असेही सुरेश पाटील म्हणाले.

# पाच खूनातील आरोपीला २० वर्षानंतर अटक

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट (दक्षिण पोलीस ठाणे) येथे दाखल असलेल्या २ महिला आणि ३ मुले अशा ५ जणांचा खून केल्याच्या आरोपावरून जन्मठेपेची शिक्षा झाल्यानंतर फरार झालेल्या जाफर बाळू पवार (वय ६० रा. सिध्दापूर ता. मंगळवेढा) या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तब्बल २० वर्षानंतर नुकतीच अटक केली.

पाच जणांचा खून केल्याच्या आरोपावरून जिल्हा न्यायालयाने जाफर बाळू पवार (रा.सिध्दापूर) याला १५ डिसेंबर १९९४ रोजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.या शिक्षेविरुध्द आरोपींने उच्च न्यायालयात (मुंबई ) अपिल दाखल केले होते. सदरचे अपील उच्च न्यायालयाने १८ मे २००५ रोजी फेटाळले होते. तेव्हापासून आरोपी मिळुन येत नव्हता. सत्र न्यायालय सोलापूर यांनी सदर आरोपी यास पकडणे बाबत स्थायी वॉरंट काढले होते.

नमुद गुन्हयाची तीव्रता लक्षात घेवुन पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी सदर स्थायी वॉरंट बजावणीसाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिले होते. सदर आरोपी हा रेकॉर्ड असुन त्याचे विरुध्द खुन, दरोडा, खुनासह दरोडा, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, फसवणुक सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे येथील पाच जणाच्या खुनांच्या गुन्हयात न्यायालयाने सुनावलेली आजन्म कारावासाची शिक्षा टाळण्याकरीता आरोपी हा मागील २० वर्षा पासुन त्याचे अस्तित्व लपविण्याकरीता वेगवेगळया ठिकाणी राहत होता. स्थानिक गुन्हे शाखेकडील सहा. निरीक्षक धनंजय पोरे व फौजदार सुबोध जमदाडे यांचे पथकाने आरोपी याची गुप् बातमीदारा मार्फत माहिती प्राप् केली. आणि त्याला काल ५ जून रोजी सिध्दापूर (ता.मंगळवेढा) येथे सापळा रचुन अटक केली. अटकेतील जाफर पवार या आरोपीला सत्रन्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपीस आजन्म कारवासाची शिक्षा भोगण्याकरीता कारागृहात रवानगी केली आहे.

# पंढरीचा विकास आराखडा जनतेला विश्वासात घेवूनच राबविला जाणार

## आ.श्रीकांत भारतीय यांचे स्पष्टीकरण

सुराज्य/सोलापूर

पंढरपूर शहरातील नागरिकांना विश्वासात घेतल्याशिवाय सत्तावीसशे कोटी रूपयांचा आराखडा येथे राबविला जाणार नाही, याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या स्पष्ट सूचना आहेत. तसेच येथील कामे करताना जर ती निकृष्ट असतील तर कारवाई केली जाईल, असे भाजपाचे आमदार श्रीकांत भारतीय यांनी स्पष्ट केल्याने पंढरपूरच्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.



आ. श्रीकांत भारतीय हे पंढरपूर दौर्यावर असताना विश्रामगृहात ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे उपस्थित होते. मागील काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूरचा २७०० कोटी रूपयांचा आराखडा तयार केल्याचे सांगितले होते. यामुळे पंढरपूरमध्ये कॅरिडोरची चर्चा रंगत होती. यावर बोलताना आमदार भारतीय म्हणाले, ज्या तीर्थक्षेत्राचा विकास करायचा तेथील नागरिकांना विश्वासात घेवूनच कामे करण्याचा त्यांचा मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांचा मानस आहे. यापूर्वी नांदेडमध्ये असा आराखडा तेथील जनतेला विश्वासात घेवून राबविला गेला आहे. पंढरपूरच्या बाबतीत ही तसेच होईल. पंढरपूरच्या नागरिकांनीही पुढील पाचशे, हजार वर्षाचा विचार करणे आवश्यक आहे. कारण आणखी दोन-चार पिढ्यानंतर या तीर्थक्षेत्राची अवस्था काय असेल हे लक्षात घेवून शासन आणि नागरिक व वारकऱ्यांनी एकत्रित येवून निर्णय घेणे गरजेचे आहे.

### निकृष्ट कामे करणाऱ्यांवर कारवाई करू

सरकारची भूमिका प्रामाणिक व संवेदनाशीलश आहे. येथील काही निकृष्ट कामांची माहिती दिली असता त्यांनी अशी कामे करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा दिला.

# कारखान्याच्या चिमणीबाबत नियोजन भवनात गोपनीय बैठक?

**जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस आयुक्तांसह विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती**

सुराज्य/सोलापूर



विमानसेवेत अडथळा ठरणारी सिध्देश्वर साखर कारखान्याची अनधिकृत चिमणी पाडण्यासाठीची तयारी पालिका प्रशासनाने सुरू केली असून याच पार्श्वभूमीवर मंगळवारी जिल्हा नियोजन भवन येथे महापालिका आयुक्तांनी गोपनीय बैठक घेतल्याची माहिती आहे. जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख देखील बैठकीस उपस्थित होते.

महापालिकेने अनधिकृत चिमणी पाडून घेण्याबाबत सिध्देश्वर कारखान्याला ४५ दिवसांच्या मुदतीची नोटीस दिली आहे. येत्या ११ जूनला नोटीसीची मुदत संपत आहे. तर नुकतेच सोलापूर दौऱ्यावर आलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही चिमणी पाडण्याची कारवाई होणारच असे संकेत दिले होते.

केंद्राच्या उड्डाण योजनेत समाविष्ट असूनही सोलापुरातून विमानसेवा सुरू होऊ शकलेली नाही. होटगी रोड विमानतळ परिसरातील श्री सिध्देश्वर साखर कारखान्याच्या को-जनरेशनची अनधिकृत चिमणी विमानसेवेला प्रमुख अडथळा असल्याने विमानसेवा सुरू होत नाही. चिमणी वाचवण्यासाठी कारखान्याने ५ ते ६ वर्षे न्यायालयीन लढा लढला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार सुनावणी घेऊन महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी कारखान्याला नोटीस बजावत अनधिकृत चिमणी पाडून घेण्यासाठी ४५ दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत कारखान्याने अनधिकृत चिमणी पाडावी अन्यथा महापालिका पाडेल. येत्या ११ जूनला ही मुदत संपुष्टात येणार आहे, त्या काळात कारखान्याने स्वत:हून चिमणी काढून न घेतल्यास महापालिका मक्तेदाराच्या माध्यमातून चिमणी पाडणार आहे. त्याअनुषंगाने आता महापालिकेने चिमणी पाडकामाच्या दृष्टीने तयारी सुरु केली आहे.

मंगळवारी नियोजन भवन येथे महापालिका आयुक्त आणि गोपनीय बैठक घेतली आहे. या बैठकीला जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख अधिकारी देखील उपस्थित होते. या बैठकीबाबत आयुक्तांनी गोपनीयता राखली आहे.

### विरोधाची शक्यता पाहून पोलीस बंदोबस्त लागणार

सन २०१८ मध्ये चिमणी पाडण्यासाठी महापालिकेची यंत्रणा मक्तेदारासह कारखाना स्थळावर गेली होती, तेंव्हा मोठा विरोध झाला होता. यावेळी देखील तीव्र विरोधाची शक्यता लक्षात घेऊन कारखाना परिसरात तैनात केला जाणार पोलिसांचा मोठा बंदोबस्त करावा लागण्याची शक्यता आहे. कारखाना परिसरात जमाव बंदी आदेश देखील लागण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर ही गोपनीय बैठक झाल्याची चर्चा आहे.

### अनधिकृत होर्डिंग बाबत बैठक : आकुलवार

शहरातील अनधिकृत होर्डिंग बाबत ही बैठक होती, असे बांधकाम परवाना विभागाच्या सारिका कुलवार यांना सांगितले.


# बहरलेल्या गांजामुळे वृद्धाला खावी लागली जेलची हवा

सुराज्य/अकलूज

७३ वर्षे वय असणा-या एका वृध्द व्यक्तीने आपली नशेची हौस भागवण्यासाठी लढवलेली शक्कल त्याला भलतीच महागात पडली आहे. सांडपाण्यावर बहरलेल्या या गांजाने जानक्या बाशा काळे या वृध्दाला जेलची हवा खावी लागलीय.

पायरी पुल-महाळुंग, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथिल रहीवाशी ७३ वर्षीय जानक्या बाशा काळे याने गांजा विकत आणून खर्च करता बसण्यापेक्षा घराच्या परसदारातच लावला. ऐन ऊन्हाळ्यातही सांडपाण्यावर ही झाडे सहा फुटांपर्यंत वाढली. झाडे बहरलेली पाहुन जानक्याचा जीवही हरकला. आता बक्कळ नशा करायला मिळणार, गांजा विकायलाही मिळणार म्हणून सुखावला. पण मध्येच माशी शिंकली. पोलीसांच्या खब-याने हि बातमी पोलीसांपर्यंत पोहोचवली.

संध्याकाळी ७ वाजता गांजाचा आस्वाद घेण्याच्यावेळी पोलीस दारात हजर झाले. येताना सोबत पंच, वजनकाटा, पंचनाम्याचे साहीत्यही आणले.



झाडांच्या पानांचे वजन केले असता ते पावणे चार किलो भरले. याची अंदाजीत किंमत रुपये ४५ हजार एवढी झाली. एनडीपीसी अक्ट ८ब, ८क, २०अ, २० ब, २२ प्रमाणे गुन्हा नोंदा करुन जानक्या काळे यांना अटक करण्यात आली.

सदरची कारवाई पो.नि. दिपरतन गायकवाड, पो.स.उ. बबन साळुंके, सुहास क्षीरसागर, विक्रम घाटगे, लक्ष्मण पिंगळे, मनोज शिंदे, सिध्दाराम कंटोळी, नितीन लोखंडे, प्रविण हिंगणगावकर, पांडुरंग जाधव यांनी केली. अधिकचा तपास पो. नि. चौधरी हे करत आहेत.